## सुविचार
सुख आणि दुःख आपोआप येत नाही ते आपण केलेल्या कर्माचे फळ असतं.

साप्ताहिक
# अधिकारनामा

Email : adhikarnama2021@ gmail.com
Web : www.adhikarnama.in

'अधिकारनामा' या साप्ताहिक साठी जिल्हा आणि तालुका प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत. इच्छुकांनी संपर्क करावा. मो. 9665382780, 9766382780

○ मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८० ○ कार्यालय : साप्ताहिक अधिकारनामा, गाडगे नगर, अमरावती – ४४४६०३

अकोला * बुधवार दि. १३ जुलै २०२२ * वर्ष २ रे * अंक १५ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842

## राज्यातील ९२ नगरपरिषदांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवायच, सुप्रीम कोर्टाचा महत्वपूर्ण निकाल!



**साप्ता. अधिकारनामा**

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुप्रीम कोर्टानं महत्वाच्या सूचना केल्या आहेत. जाहीर झालेल्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय होतील असं सुप्रीम कोर्टानं म्हटलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या याआधीच जाहीर झालेल्या निवडणुकीसाठी नवीन अधिसूचना काढू नका असे निर्देश सुप्रीम कोर्टानं दिले आहेत. त्यामुळे राज्यातील ९२ नगरपरिषदांच्या निवडणुका आता घोषणा करण्यात आलेल्या वेळेत आणि ओबीसी आरक्षणाविना होणार हे निश्चित झालं आहे. राज्य सरकारने आज सुप्रीम कोर्टात बांठिया आयोगाचा अहवाल सादर केला आहे. ओबीसी आरक्षणासाठी आवश्यक असणारी ट्रिपल टेस्ट पूर्ण केली असल्याचं राज्य सरकारनं सुप्रीम कोर्टाला सांगितलं. त्यानंतर सुप्रीम कोर्टानं जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमात कोणताही बदल न करण्याचे आदेश दिले. त्याशिवाय, नवीन निवडणुका जाहीर न करण्याचेही निर्देश दिले आहेत. ओबीसी आरक्षणाबाबतची पुढील सुनावणी १९ जुलै रोजी होणार आहे. त्यामुळे आता बांठीया आयोगाच्या आधारे ओबीसींना आरक्षण मिळणार का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

राज्य निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या ९२ नगरपरिषदांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासह घेण्याचा सरकारचा प्रयत्न होता. सुप्रीम कोर्टात पावसाळा आणि इतर प्रशासकीय अडचणी सांगत या निवडणुका पुढे ढकलण्याचा प्रयत्न राज्य सरकारच्या वकिलांनी केला. मात्र, निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाल्याने या निवडणुकात बदल होणार नसल्याचं कोर्टानं स्पष्ट केलं आहे. दरम्यान, ज्या निवडणुकांचा कार्यक्रम अद्याप जाहीर झालेला नाही त्या ठिकाणचे ओबीसी आरक्षण बांठिया आयोगाच्या वैधतेवर अवलंबून आहे. बांठिया आयोगाने महापालिका, जिल्हा परिषद आदी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रनिहाय मतदार यादीतील मतदारांच्या आडनावांवरून ओबीसींची संख्या निश्चित केली आहे. आता १९ जुलै रोजी होणाऱ्या सुनावणीत कोर्ट काय भूमिका घेणार हे पाहणं महत्वाचं असणार आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १९ जुलैचा निकाल अत्यंत महत्वाचा ठरणार आहे.


## जसप्रीत बुमराहच्या झंजावातात इंग्लंडची वाताहत; भारताचा दहा गडी राखून दणदणीत विजय




**साप्ता. अधिकारनामा**

**वृत्तसंस्था :** भारत आणि इंग्लंड यांच्यात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना केनिंग्टन ओव्हलवर झाला. हा सामना भारताने १० गडी राखून जिंकला. जसप्रीत बुमराहचे सहा बळी आणि कर्णधार रोहित शर्माचे अर्धशतक, ही आजच्या सामन्याची वैशिष्ट्ये ठरली. जसप्रीत बुमराहच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरीमुळे भारतीय संघाने इंग्लंडला २५.२ षटकांमध्ये गुंडाळले होते. इंग्लंडने सर्व गडी गमावून ११९ धावा केल्या. भारताविरुद्ध इंग्लंडची ही आतापर्यंतची सर्वात कमी धावसंख्या ठरली. इंग्लंडने दिलेले १११ धावांचे लक्ष्य भारताने १८.४ षटकांमध्येच पूर्ण केले. कर्णधार रोहित शर्मा आणि शिखर धवन यांनी भारतीय डावाची सुरुवात केली. दोघांनी संयमी फलंदाजी करत भारताला सहज विजय मिळवून दिला. रोहित शर्माने नाबाद ७६ आणि शिखर धवनने नाबाद ३१ धावांची खेळी केली. त्यामुळे भारताने यजमान इंग्लंडचा त्यांच्याच भूमीवर १० गडी राखून पराभव केला. त्यापूर्वी, भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय गोलंदाजांनी हा निर्णय योग्य ठरवला. जसप्रीत बुमराहने इंग्लंडला सुरुवातीला दोन धक्के दिले. आपल्या पहिल्याच षटकात त्याने जेसन रॉयला आणि जो रूटला बाद केले. दोघांना खातेही उघडता आले नाही. रॉय आणि रूट दोघेही बाद झाल्यानंतर बेन स्टोक्स मैदानात आला. मात्र, मोहम्मद शमीने त्यालाही शून्यावर बाद केले. सुरुवातीचे तीन खेळाडू बाद झाल्यानंतर जॉनी बेअरस्टो इंग्लंडचा डाव सांभाळेल असे वाटत होते. मात्र, जसप्रीत बुमराहने त्याचीही डाळ शिजू दिली नाही आणि तो पंतच्या हाती झेलबाद झाला. बेअरस्टोने सात धावा केल्या. जसप्रीत बुमराहने लियाम लिव्हिंगस्टोनलाही शून्यावर बाद केले. जसप्रीत बुमराहने आजच्या सामन्यात अवघ्या १९ धावा देऊन सहा बळी घेतले. मोहम्मद शमीने तीन आणि प्रसिद्ध कृष्णाने एक बळी घेऊन इंग्लंडचा डाव थोडक्यात गुंडाळण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. इंग्लंडचा सर्व संघ ११० धावांमध्ये बाद झाला. आजचा सामना जिंकल्यामुळे तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारताला १-० अशी आघाडी मिळाली आहे. मालिकेतील दुसरा सामना १४ जुलै रोजी लॉर्ड्स क्रिकेट स्टेडियमवरती होणार आहे.


## नाल्यात सहा प्रवाशांसह जीप वाहून गेली, तिघांचे मृतदेह सापडले



**साप्ता. अधिकारनामा**

**नागपूर :** जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील नांदा गावाजवळ एक प्रवासी जीप नाल्याच्या पुरात वाहून गेली. त्यात सहा प्रवासी होते. सायंकाळपर्यंत तिघांचे मृतदेह सापडले होते. उर्वरितांचा शोध सुरू आहे.सापडलेल्या मृतदेहांमध्ये एक महिला,एक पुरूष व एका लहान मुलाचा समावेश आहे. ग्रामीण पोलिसांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. नागपूर जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. सहा तालुक्यांमध्ये अतिवृष्टी आली आहे.अनेक नद्या-नाल्यांना पूर आला आहे. मंगळवारी सावनेर तालुक्यातील केळवद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदा येथील एका नाल्याच्या पुरात प्रवासी जीप वाहून गेली.त्यात सहा प्रवासी होते. पुलावरून पाणी वाहत असताना चालकाने पाण्यातून जीप पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पाण्याच्या प्रवाहात जीप वाहून गेली. बचाव पथक घटनास्थळी गेले आहे.

## लोकसंख्येच्या बाबतीत भारत लवकरच टाकणार चीनला मागे; संयुक्त राष्ट्राचा दावा



**साप्ता. अधिकारनामा**

**नवी दिल्ली :** भारत पुढील वर्षी (२०२३ मध्ये) जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनून चीनला मागे टाकण्याची शक्यता आहे. संयुक्त राष्ट्राने जाहीर केलेल्या अहवालात हे नमूद करण्यात आले आहे. सध्या भारताची लोकसंख्या १४०.६६ कोटींवर पोहोचली असून दरवर्षी ०.९ज्ञ् या दराने लोकसंख्या वाढत असल्याचे समोर आले आहे. २०११ साली जगाची लोकसंख्या ७ अब्ज होती. २०२१ मध्ये जगाची लोकसंख्या ७.८ अब्ज होती. आता २०३१ मध्ये जगाची लोकसंख्या ८.६ अब्ज होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या दशकभरात जगाच्या लोकसंख्येत १.१ टक्के दराने वाढत झाली आहे. सध्या जगाची लोकसंख्या दरवर्षी ०.९ टक्के वेगाने वाढत आहे. अफ्रिकेची लोकसंख्या सर्वाधिक म्हणजे २.५ टक्क्यांनी वाढताना दिसत आहे.जगाची लोकसंख्या ९ अब्ज होईल त्यावेळी लोकांना अन्न पुरवण्याचे सगळयात मोठे आव्हान जगासमोर असेल, असे मत संयुक्त राष्ट्राने व्यक्त केले आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येची अन्नाची भूक भागवण्यासाठी विकसित देशांना आपले कृषी उत्पादन ६० टक्क्यांनी वाढवावे लागेल. तर विकसनशील देशांना आपले कृषी उत्पादन दुप्पट करावे लागणार आहे.

युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंड जाहीर केलेल्या अहवालानुसार भारताने अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती केली आहे, मात्र, भारतात अजूनही बालविवाह सारख्या प्रथा परंपरा नष्ट झाल्या नसल्याचे समोर आले आहे. भारतात आजही २७ टक्के मुलींचे लग्न १८ वर्षाच्या आत होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## गोवा काँग्रेसमधील बंडखोरीशी भाजपचा काहीही संबंध नाही : मुख्यमंत्री प्रमोद सावंत



**साप्ता. अधिकारनामा**

**पणजी :** महाराष्ट्रानंतर आता गोव्यातील राजकारण तापताना दिसत आहे. गोवा काँग्रेसमधील ११ आमदारांपैकी पाच आमदार बंडखोरीच्या मार्गावर असल्याच्या चर्चा सुरु आहेत. तसेच हे आमदार भाजपाच्या संपर्कात असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, काँग्रेसच्या आमदारांच्या बंडखोरीशी भाजपाचा काहीही संबंध नसल्याचे स्पष्टीकरण गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दिले आहे. सोमवारी रात्री पणजीत पक्षाचे ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला काँग्रेसचे दहा आमदारही उपस्थित होते. काँग्रेसचे पाच आमदार मायकल लोबो, दिगंबर कामत, केदार नाईक, राजेश फळदेसाई आणि डेलियाला लोबो यांच्याशी रविवारी संपर्क होऊ शकला नसल्याच्या वृत्तानंतर काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी त्यांचे विश्वासू मुकुल वासनिक यांना तातडीने गोव्याला पाठवले असल्याचे सांगण्यात येत आहे.

काँग्रेसने मायकल लोबो आणि गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्यावर पक्षात फूट पाडण्यासाठी सत्ताधारी भाजपसोबत हातमिळवणी केल्याचा आरोप केला होता. काँग्रेसने विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदावरून लोबो यांना हटवले होते. बो यांची पदावरून हकालपट्टी झाल्याची घोषणा करताना पक्षाचे गोवा प्रभारी दिनेश गुंडू राव म्हणाले की, या लोकांनी काँग्रेससोबत राहून सत्ता उपभोगली, पण आज हे लोक लोभी झाले आहेत. मी मायकल लोबो आणि दिगंबर कामत यांच्या कृतीबद्दल खूप निराश आहे. गोव्यात ओढवलेल्या राजकीय संकटावर मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी वक्तव्य केले आहे. ही लोकशाही नाही पैसेशाही असल्याची टीका दिग्विजय सिंह यांनी केली आहे.

## पावसाळापूर्व कामे रखडली, भाजपकडून नाराजी ; कामे तातडीने पूर्ण करण्याची आयुक्तांकडे मागणी



**साप्ता. अधिकारनामा**

**पुणे :** पावसाळा पूर्व कामांच्या नियोजनात अनेक त्रुटी असून महापालिका प्रशासनाकडून निष्काळजीपणा दाखविला जात असल्याचा आरोप करत भारतीय जनता पक्षाकडून या कामांबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. नालेसफाई बरोबरच पूरपरिस्थितीची उद्भवणाऱ्या ठिकाणी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पावसाळा पूर्व कामांसंदर्भात भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळाने आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांची भेट घेतली. पावसाळा सुरू झाला तरी अपूर्ण असलेली नालेसफाई, निकृष्ट दर्जाची पावसाळी कामे, अद्यापही 'जैसे थे' स्थितीत असलेला राडारोडा आणि आपत्ती व्यवस्थापनाचा अभाव अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. त्याबाबतची माहिती जगदीश मुळीक यांनी दिली. प्रदेश उपाध्यक्षा वर्षा तापकीर, सरचिटणीस गणेश घोष, उपाध्यक्ष गणेश कळमकर, माजी उपमहापौर सरस्वती शेंडगे, सुशिल मेंगडे यांच्यासह मंडल अध्यक्ष व नगरसेवक उपस्थित होते.

मुळीक म्हणाले की, वाढता पाऊस आणि संभाव्य पुरस्थितीचा धोका लक्षात घेऊन प्रभाग स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन करावे, अशी मागणी आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे करण्यात आली आहे. अति पावसाच्या कालावधीत नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू नये आणि त्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय साधावा याची दक्षता घेणे आवश्यक आहे. महापालिकेच्या विविध विभागात पोलीस प्रशासन पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि स्मार्ट सिटी यातील समन्वय महत्त्वाचा असल्याची बाब आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली आहे. पावसाचे पाणी साठण्याची संभाव्य ठिकाणे, रस्त्यात पडणारे खड्डे, पाण्याचा निचरा होण्याचे मार्ग, मोठे नाले, पुरामुळे बाधीत होणारे परिसर, निवारा यांची संख्या, साधन सामग्री आदींबाबत तातडीचे नियोजन करण्याची मागणी करण्यात आल्याचे मुळीक यांनी सांगितले.

## कल्याण, उल्हासनगर आयुक्तांची बदली






**साप्ता. अधिकारनामा**

**उल्हासनगर :** करोनाच्या पहिल्या लाटेत कल्याण आणि उल्हासनगर यांसारख्या शहरात भारतीय प्रशासकीयसेवेतील वैद्यकीय पार्श्वभूमी असलेल्या डॉ. विजय सूर्यवंशी आणि डॉ. राजा दयानिधी यांची नेमणूक झाली होती. मात्र दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर या दोन्ही महापालिका आयुक्तांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्तपदी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भाऊसाहेब दांगडे यांची तर उल्हासनगर महापालिका आयुक्तपदी अजीज शेख यांची बदली करण्यात आली आहे. येत्या काही दिवसात दोन्ही महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर या बदल्या महत्वाच्या मानल्या जात आहेत. कल्याण डोंबिवली महापालिका आणि उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांची नुकतीच बदली झाली आहे.

करोनाच्या पहिल्या लाटेत दोन्ही शहरांवर भारतीय प्रशासकीय सेवेतील आणि वैद्यकीय पार्श्वभूमी असलेल्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त पदी डॉ. विजय सूर्यवंशी यांची तर उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्तपदी डॉ. राजा दयानिधी यांची नेमणूक झाली होती. करोना काळात जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे या नेमणुकीसाठी आग्रही होते, अशी चर्चा होती. त्यानंतर या दोन्ही अधिकाऱ्यांच्या माध्यमातून दोन्ही शहरांमध्ये करोना नियंत्रणाचे काम प्रभावीपणे झाले. उल्हासनगर शहर देशातील अत्यंत दाटी-वाटीच्या शहरांच्या यादीत अग्रस्थानी मानले जाते. या शहरात कोरोना प्रतिबंध करण्यास मोठ्या प्रमाणावर यश आले. मात्र करोना वगळता इतर कामांमध्ये डॉ. राजा दयानिधी छाप पाडू शकले नाहीत. गेल्या काही महिन्यांपासून अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यापासून दयानिधी यांनी बचावात्मक भूमिका घेतल्याचा आरोप होत होता. तर कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात कोरोना नियंत्रण मोहीमेत बहुतांशी यश आल्याचे बोलले जात होते.

## गॅस, वीज दरवाढीच्या निषेधार्थ काँग्रेसचे आंदोलन



**साप्ता. अधिकारनामा**

**पुणे :** केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात केलेली वाढ आणि राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारच्या वीज दरवाढीच्या निषेधार्थ काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले. काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दीप बंगला चौक येथे आंदोलन झाले. प्रदेश उपाध्यक्ष रमेश बागवे, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, राज्य प्रवक्ता गोपाळ तिवारी, दत्ता बहिरट, लता राजगुरू, अजित दरेकर, मनिष आनंद, वैशाली मराठे, नीता रजपूत, संगिता तिवारी, पुजा आनंद यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. केंद्रातील मोदी सरकारने सर्व सामान्यांच्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढविण्याची सुपारी घेतली असून आधीच महागाईमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना घरगुती गॅस सिलेंडरचे दर पन्नास रुपयांनी वाढवून नागरिकांच्या त्रासात भर टाकली आहे. केंद्र आणि राज्य सरकार सर्वसामान्य नागरिकांच्या विरोधात असून केवळ जाहिरातबाजी, सरकार पाडण्यात आणि ते सत्ता टिकविण्यात मश्गुल आहे.

साप्ताहिक
# अधिकारनामा



## संपादकीय

## काली, वाद आणि वस्तुस्थिती

बंगाल आणि परिसरात कालीची उपासना पद्धत तंत्रमार्गी आणि सामान्यांना काहीशी अघोरी वाटणारी आहे. पण कालीच्या रूपाबाबत देशभर वेगवेगळ्या संकल्पना आहेत. असे असताना हातात एलजीबीटी समूहाचा झेंडा घेतलेली आणि धूम्रपान करणारी काली माता चित्रपटाच्या पोस्टरवर दाखवण्यातून काय साधायचे असावे? शक्ती म्हणजे पराक्रम, सामर्थ्य. 'शक् म्हणजे समर्थ होणे. मुळातच शक् या धातुपासून शक्ती या शब्दाची उत्पत्ती झाली. चराचरामध्ये कार्यान्वित असते ती म्हणजे शक्ती. शक्ती ही अनंत आहे. उत्पत्ती- स्थिती- लय हा शक्तीचा गुणधर्म आहे. म्हणूनच उत्क्रांतीच्या प्रारंभिक टप्प्यावर मानवाने आपल्या उपास्य कर्म-धर्म, प्रारब्धात प्रथम स्थान दिले ती म्हणजे मातृशक्ती. ही मातृशक्ती आज अनेक नावांनी ओळखली जाते. कधी ती भवानी असते तर कधी काली. या जगदंबेला कुठल्या स्वरूपात आळवावे हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरी कालौघात आपल्या आराध्य शक्तीची सगुण प्रतिमा कशी असावी या संदर्भात काही शास्त्रे ही प्रचलित झाली आणि या शास्त्रांनुसार तयार करण्यात आलेल्या प्रतिमा या सांस्कृतिक व धार्मिक समाजाचा अविभाज्य भाग ठरत गेल्या. किंबहुना या प्रतिमा त्या देवता संप्रदायाची वा पर्यायाने त्या समाजाच्या सांस्कृतिक-आध्यात्मिक परंपरांचा ठेवा जोपासणाऱ्या प्रतिनिधी ठरल्या. त्यामुळेच त्यांच्या सगुण रूपाशी झालेली छेडछाड ही अनेक अर्थाने त्या समाजाच्या भावनिक अंतरंगाला हादरवून टाकणारी असते. म्हणूनच लीना मणिमेकलई निर्मित 'काली' या सिनेमाच्या वादग्रस्त पोस्टरवरून देशात बराच वाद व त्यानिमित्ताने ऊहापोह झाला. काली मातेच्या हातात असलेला एलजीबीटी समूहाचा झेंडा व साक्षात काली धूम्रपान करताना दर्शविलेल्या या पोस्टरमुळे जुन्याच वादाला नव्याने वाचा फुटली आणि असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कुठलाही वाद म्हटला की दोन बाजू आल्याच; एक समर्थकांची आणि दुसरी विरोधकांची. सध्या तरी विरोधकांची बाजू भावना दुखावली गेली अशी असली तरी समर्थक मात्र समर्थनासाठी अनेक बाबी सांगत आहेत. त्यात मुख्य युक्तिवादाचा मुद्दा आहे तो म्हणजे 'आमच्यात देवी अशीच असते. आमच्या देवीला धूम्रपान-दारू- मांस वर्ज्य नाही. मग त्याच रूपात देवीला दाखवले तर इतरांना अडचण का असावी?' हा. इथे प्रश्न असा निर्माण होतो की, काली पोस्टरच्या समर्थनात केल्या जाणाऱ्या या युक्तिवादात काही तथ्य आहे का? आणि असलेच तर या वादासाठी ते समर्थनीय आहे का? हे पडताळण्यासाठी इतिहासाच्या गर्तेत डोकावून पाहणे क्रमप्राप्त ठरते.

मूलतः भारत हा बहुआयामी देश आहे. जितके आयाम तितकाच बहुरंगी इतिहास. भारतीय उपखंडाच्या हजारो वर्षांच्या इतिहासात अनेक संस्कृती जन्माला आल्या, तर काही बाहेरून येऊन इथे विसावल्या व येथेच एकसंध झाल्या. त्यामुळे साहजिकच परस्पर प्रभाव हा आजच्या भारतीय संस्कृतीवर निश्चितच आहे. किंबहुना म्हणूनच या देशाची ओळख 'विविधतेत एकता' अशी आहे. या प्रक्रियेतून धार्मिक संकल्पना व परंपरा याही अलिप्त राहू शकल्या नाहीत. त्यामुळेच एकाच धर्मांतर्गत प्रादेशिक बदलानुसार निराळेपण हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच काली या देवतेशी संलग्न पूजाविधी, परंपरा, प्रतिमा विज्ञान समजून घेताना ही गोष्ट प्रकर्षाने सांभाळावी लागते. कालीच्या उत्पत्तीविषयीच्या अनेक कथा आहेत. त्यात प्रामुख्याने मधु-कैटभ, चंड-मुंड, रक्तबीज यांसारख्या असुरवधाच्या कथा समाविष्ट आहेत. महाकाली हे कालतत्त्वाचे प्रतीक असून तिला शत्रुविनाशिनी मानले जाते. 'महानिर्वाणतंत्रा'त सांगितल्याप्रमाणे काली वस्तुतः अरूप आहे. परंतु गुण व क्रिया यांना अनुसरून तिच्या सगुणाची कल्पना केली जाते. प्रतिमा विज्ञानानुसार काली ही चतुर्भुजा किंवा दशभुजा असते. कालीची उपासना अनेक रूपात केली जाते. त्यात मुख्यतः दक्षिणकाली (दक्षिणाकाली), वामकाली, संहारकाली, भद्रकाली, रक्षकाली, गुह्यकाली, सिद्धिकाली इत्यादी अनेक रूपांचा समावेश होतो व या प्रत्येक संकल्पनेनुसार कालीचे स्वरूप बदलते. कालीचे दक्षिणाकाली हे स्वरूप सरळ मार्गी साधना/ दक्षिणाचार (उजवा साधना मार्ग) निदर्शित करते. या रूपाची पूजा सर्व सामान्य घरांमध्ये प्रचलित आहे. तर याउलट कालीची वामकाली व संहारकाली ही रूपे वाममार्ग दर्शवतो. यांची पूजा तांत्रिक व युद्धभूमीवर केली जाते. वास्तविक काली देवीची उपासना ही संपूर्ण भारतात केली जाते. परंतु बंगाल व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात कालीची होणारी उपासना ही तंत्रमार्गी असल्याने आपले वेगळेपण सिद्ध करते. या भागात कालीची उपासना प्राचीन काळापासून प्रचलित आहे. तंत्रमार्गानुसार आदि पराशक्तीच्या ज्या दशमहाविद्या आहेत त्यामध्ये कालीचा समावेश होतो. या परिसरातील तंत्रग्रंथानुसार काली पूजेत 'सुरा' ही अत्यावश्यक मानली आहे. पूजाविधीत मंत्राने शुद्ध करून तिचे सेवन केले जाते. 'कालीकोपनिषदा'त नमूद केल्याप्रमाणे ही पूजा काली यंत्रावर करायची असून कार्तिक कृष्ण पक्षात, विशेषतः रात्रीची पूजा फलदायी मानली जाते. बंगाल, ओडिशा, आसाममध्ये काली पूजेच्या वेळी बळी देण्याची प्रथा आहे. यामध्ये बकरा, कोंबडा, रेडा या प्राण्यांचा समावेश असतो. तंत्रग्रंथांमध्ये कालीला बळी कशा प्रकारे द्यावा याचे सविस्तर विवेचन आढळते. विशेष म्हणजे बळी देणे व तोच प्रसाद ग्रहण करणे यामध्ये सर्व जातीय समाजाचा सहभाग आढळून येतो. पूर्व भारतात आढळून येणाऱ्या अशा स्वरूपाच्या पूजाविधींमुळे अनेकदा उर्वरित भारतात संभ्रम निर्माण होतो. परंतु त्यामागील कारणे आपल्याला तंत्रमार्गात सापडतात. काली उपासना ही शाक्त संप्रदायात प्रधान आहे. शाक्त पंथामध्ये काली व त्रिपुरा असे देवतांचे संप्रदाय आहेत.

वास्तविक इतिहास पाहता शाक्त हा मूलतः शैव पंथाचा भाग आहे तरीही उपासना मार्गाने त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. तांत्रिक उपासनेत 'भोग' आणि 'मोक्ष' प्रधान मानले जातात. काही शाक्त तंत्रांमध्ये भोग हा शब्द संभोग या अर्थाने वापरला जातो. अशा प्रकारे साधना मार्ग अवलंब करणाऱ्या तांत्रिक उपासनेला कुलाचार किंवा वामाचार म्हटले जाते. असे असले तरी त्यामुळे संपूर्ण तंत्र मार्ग वामाचारी ठरत नाही. शाक्त पंथात आढळणाऱ्या याच वामाचारी उपासनेचा दाखला कालीला धूम्रपान करताना दाखवलेल्या पोस्टरच्या समर्थनार्थ दिला जात आहे. मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा, मैथुन यांना एकत्रितरीत्या पंचमकार म्हटले जाते. तांत्रिक पंथात उपासना विधीत पंचमकारांचा समावेश होतो. म्हणजेच या पाच गोष्टींचा वामाचारानुसार देवीच्या पूजाविधीत समावेश केला जातो. परंतु दक्षिणाचारानुसार या पंचमकारांचे अर्थ बदलतात. इथे आपण कालीविषयी जाणून घेत असलो तरी तंत्राशेखी संबंधित इतर पंथांमध्ये कमी-अधिक प्रमाणात असेच चित्र दिसते. तंत्र साधनेत शैव हा पंथ प्रधान आहे. शिवाच्या ऊर्ध्व मुखातून तंत्रे प्रसृत झाली असे मानले जात असल्याने तांत्रिक संप्रदायाचा जनकही शिवालाच मानले जाते. त्यामुळेच शैव संप्रदायाच्या वामाचारी शाखेतील अघोरी व तत्सम साधू चिलीम वगैरेंचा वापर करताना आढळतात (आठवून पाहा कुंभमेळ्यातील साधूंचे किंवा हिमालयातील साधूंचे फोटो). तसेच अनेक पहारी लघुचित्रांमध्ये शिव स्वतः चिलीम ओढताना किंवा भांग-गांजा सेवन करताना दाखवला जातो. अनेक ठिकाणी शिवासोबत शक्ती/ पार्वती ही रेखाटलेली दिसते. परंतु या सर्व चित्रांचा काळ १७-१८व्या शतकाच्या आधी जात असावा असे प्रथमदर्शनी तरी दिसत नाही. कलेतिहासाचा विचार करता बहुतांश चित्रांवर मुघल लघुचित्रांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. मंदिर स्थापत्याचा विचार करता शिवाचे अशा स्वरूपाचे दर्शन शिल्पांमध्ये विरळाच आहे. प्रत्यक्षात शिवाच्या प्रतिमा विज्ञानामध्ये शिवाला चिलीम, भांग-गांजासोबत दाखवावे असे कोणतेही संकेत मिळत नाहीत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काली चित्रपटाच्या पोस्टरमध्ये दाखवण्यात आलेला एलजीबीटी समूहाचा झेंडा. एलजीबीटी समूह हा अनेकांसाठी वादाचा, कुतूहलाचा विषय होता व आहे. प्राचीन भारतात एलजीबीटी समूहाचे स्थान काय होते, हे जाणून घेण्यासाठी फारच त्रोटक साधने आज उपलब्ध आहेत. पुराण, महाकाव्य यांमधून काही प्रमाणात पुसटशी कल्पना येते. शिखण्डी, बृहन्नडा काही अंशी एलजीबीटी समाजावर प्रकाशझोत टाकतात. त्याशिवाय मध्ययुगीन मंदिरांवरील शिल्पांमधून तत्कालीन समाजातील समलैंगिक संबंधांबद्दल माहिती मिळते.

## आता अमरावतीची 'प्रयोगशाळा'?



वऱ्हाड प्रांताला परंपरा आहे ती सलोख्याच्या राजकारणाची. पण आधी शिवसेना आणि नंतर भाजप या दोन्ही पक्षांनी आपापली मतपेढी तयार करण्यासाठी इथे ध्रुवीकरणाची चाल खेळली. त्याची विखारी फळे आता दृष्टीपथात येऊ लागली आहेत. ही गोष्ट आहे फाळणीच्या वेळची. तेव्हा देशाच्या विविध भागात उसळलेल्या हिंदु-मुस्लीम दंगलींचे लोण वऱ्हाडात पोहोचले. या प्रांतातील अनेक शहरांत तणावाची स्थिती निर्माण झाली. अमरावतीतसुद्धा काही भागात दंगल सुरू झाल्याबरोबर काँग्रेसचे तत्कालीन नेते वीर वामनराव जोशी रस्त्यावर उतरले. त्यांनी सोबत घेतले अबूल हसन यांना. मुस्लीम समाजाचे नेतृत्व करणारे हसन व जोशी एका मोटारीमधून साऱ्या शहरभर फिरले. दोन्ही धर्मातील लोकांची समजूत काढली. त्याचा परिणाम असा झाला की काही तासात शहर पूर्वपदावर आले. हाच सामंजस्याचा वारसा नंतर या शहरातील अनेक राजकीय नेत्यांनी पुढे नेला. नेतेच नाही तर सामाजिक क्षेत्रात काम करणारेसुद्धा तणावाच्या स्थितीत धार्मिक सद्भाव कायम राहावा यासाठी अनेकदा झटले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांना गुरू मानणारे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रमुख प्रभाकरराव वैद्य हे यातले प्रमुख नाव. दंगलीमुळे होणाऱ्या धार्मिक ध्रुवीकरणाचा राजकीय फायदा घ्यावा असे यापैकी कुणाच्याही मनात आले नाही. त्यामागील कारणांचा शोध घ्यायचा तर वऱ्हाड प्रांताच्या इतिहासात डोकावावे लागते.

पुराणकाळात हा गवळयांचा प्रांत म्हणून ओळखला गेला. कौंडण्यपूरचे महत्त्व तेव्हापासूनचे. नंतरच्या मध्ययुगीन काळात हा संपूर्ण भाग निझामांच्या राजवटीखाली होता. अचलपूर ही त्यांची राजधानीच होती. या काळात देशाच्या वेगवेगळया प्रांतातील मुस्लीम येथे येऊन स्थायिक झाले. गावे व शहरांमध्ये या समुदायाची संख्या वाढली पण दोन धर्मात तणावाचे प्रसंग क्वचितच उद्भवायचे. का तर त्याचे उत्तर निझामांच्या द्रष्टेपणात दडलेले. त्यांनी जमीनदारी, जहागीरदारीचे काम सांभाळण्यासाठी अनेक ब्राह्मणांना या प्रांतात आणले. सोबतीला याच कामात गुंतलेले कुणबी व मराठा होतेच. त्यामुळे एकूणच प्रांताचे धार्मिक व जातीय संतुलन कायम राहिले. त्याचा परिणाम सलोखा वाढण्यात झाला. नंतर मराठय़ांची राजवट आली. सतराव्या शतकाच्या शेवटी व अठराव्या शतकाच्या प्रारंभी इंग्रजांशी त्यांच्या लढाया सुरू झाल्या. त्यात हार पत्करावी लागल्यावर इंग्रजांचा अंमल सुरू झाला. याही काळात सलोख्याचा इतिहास या प्रांताने टिकवून ठेवला. स्वातंत्र्यलढय़ाने वेग घेतल्यावर रामराव देशमुख, दादासाहेब खापर्डे व पंजाबराव देशमुखांकडे या भागाचे नेतृत्व आले. त्यातले देशमुख सरदार पटेलांचे तर खापर्डे टिळकांचे अनुयायी. इंग्लंडमध्ये जाऊन लोकमान्यांचा खटला लढणारे खापर्डे अशीच त्यांची ओळख. जहाल व उजव्या विचाराचे अशी त्यांची प्रतिमा. दुसरीकडे पंजाबराव कृषी, शिक्षण व समाजसेवा यात अधिक रमणारे काँग्रेसचे नेते. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत रामरावांना काँग्रेसची उमेदवारी मिळणार हे जवळजवळ नक्की झाले असताना गोळवलकर गुरुजींसोबतचे त्यांचे एक छायाचित्र प्रसिद्ध झाले व गोंधळ उडाला. मग नेहरूंनी पंजाबरावांना उमेदवार केले. अमरावतीतील ज्येष्ठ पत्रकार व 'लोकसत्ता'तील माजी सहकारी शशिकांत ओहळे यांनी 'जननायक' या पुस्तकात नोंदवलेल्या या इतिहासाचे स्मरण यासाठीच की हा प्रांत कधीही उजव्या विचारांना थारा देणारा नव्हता. वेगवेगळय़ा राजवटींच्या काळात झालेल्या सांस्कृतिक व सामाजिक घुसळणीतून तावूनसुलाखून निघालेल्या या भागात मलकापूरचा अपवाद सोडला तर जनसंघाचे अस्तित्वही इथे नव्हते. पंजाबरावांच्या शिक्षण व कृषी क्षेत्रातील क्रांतीमुळे शिक्षित व प्रगत झालेल्या या भागाचा धार्मिक सामंजस्य दाखवण्यावरच जास्त भर राहिला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे काम अमरावतीत पुढे नेणाऱ्या शेख वजीर पटेलांचे नेतृत्व समोर आले ते या पार्श्वभूमीवर. या सलोख्याला पहिल्यांदा गालबोट लागले ते बाबरीच्या पतनानंतर. त्याच्या म्हणजे १९९२ च्या पाच वर्षे आधी 'रिडल्स'वरून झालेला वाद जातीय तणाव निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरला. 'बाबरी'मुळे त्यात धार्मिकतेची भर पडली. नेमके त्याच काळात या भागात शिवसेनेचे आगमन झाले. काँग्रेसचे प्रस्थापित नेतृत्व तरुणांना संधी नाकारत असताना ओबीसी, बहुजनांना हिंदुत्वाचा उघड पुरस्कार करणारी ही संघटना जवळची वाटली. धार्मिक ध्रुवीकरणातून राजकीय वाटचाल सुकर करत नेण्याचा प्रयोग सुरू झाला तो या काळात. अर्थात तेव्हाही या भागात हिंदु व मुस्लिमांमध्ये खूप दंगली झाल्या असे नाही. मात्र या दोन धर्मामध्ये असलेली पारंपरिक तेढ व बाबरीनंतर त्यात ओतले गेलेले तेल यामुळे शिवसेनेचा प्रवास या भागात वेगाने पुढे गेला. भाजप-सेनेची युती होती पण या भागात भाजप सेनेची 'ब' टीम म्हणूनच दीर्घकाळ वावरली. काही काळानंतर 'शतप्रतिशत'चा ध्यास घेतलेल्या भाजपने युतीत असूनही अकोला, बुलढाणा भागांत स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले, पण वऱ्हाडाचा केंद्रिबदू असलेल्या अमरावतीत या पक्षाला म्हणावे तसे यश आजवर मिळाले नाही. मतांच्या ध्रुवीकरणासाठी उत्तम पार्श्वभूमी असूनही यश मिळत नाही या प्रश्नाने वैतागलेल्या या पक्षाने नेतृत्वाच्या पातळीवर अनेक नवनवे प्रयोग या भागात केले.

## इथे सोयीचा 'इतिहास' लिहिला जात आहे.

इतिहासातील 'चुकां'ची दुरुस्ती करण्याचं काम सध्या केंद्रातील सत्ताधारी पक्ष आणि त्यांच्या आसपासच्या संघटना जोरात करत आहेत. पण आज घडणाऱ्या घटना खोट्या वा अर्धसत्य स्वरूपात भविष्यात नोंदवल्या जाणं, हे आताच थांबवायला हवं. राहुल गांधी यांनी वायनाडप्रकरणी दिलेल्या प्रतिक्रियेची मोडतोड हादेखील यातलाच प्रकार आहे. इतर अनेक राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही भाजपने 'ऑपरेशन लोटस' राबवून, सत्तेत असलेल्या महाविकास आघाडीला धक्का देऊन आणि शिवसेनेत फूट पाडून अखेर सरकार स्थापन केलं. राज्यात हे घडत असताना देशात नूपुर शर्मा प्रकरणावरून रान पेटलं होतं. उदयपूर इथं एका शिवणकाम व्यावसायिकाची हत्या करण्यात आली. या व्यावसायिकानं नूपुर शर्मा यांच्या वक्तव्यांचं जाहीर समर्थन केलं होतं, असा आक्षेप हत्या करणाऱ्यांनी घेतला होता. इथे एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. काँग्रेसची विचारसरणी मानणारी कोणतीही व्यक्ती अशा प्रकारच्या हिंसेचं समर्थन करणार नाही. नूपुर शर्मा यांनी जे काही विधान केलं, त्याचा न्याय न्यायव्यवस्था करेल. पण त्यांच्या विधानाला समर्थन दिल्याने कोणाचीही हत्या होत असेल, तर ते निंदनीय आहे. काँग्रेसच्या विचारसरणीला अनुसरून या हत्येचा निषेध केला गेला. अगदी राहुल गांधी यांनीही याबाबत कठोर प्रतिक्रिया दिली होती. धर्माच्या नावावर सुरू असलेलं क्रौर्य खपवून घेतलं जाणार नाही, एवढ्या स्पष्ट शब्दांमध्ये राहुल गांधी यांनी या हत्येचा निषेध केला होता.

वास्तविक या घटनेचा तपास होऊन गुन्हेगारांना शिक्षा होणं, एवढी सरळ ही बाब होती. पण सध्या कोणत्याही गोष्टीला धार्मिक रंग देऊन समाजात फूट पाडत आपली राजकीय पोळी भाजण्यात अनेकांना स्वारस्य आहे. त्यामुळे याबाबतीतही उदयपूरमधील हल्लेखोरांना काँग्रेस कशी पाठीशी घालत आहे, हे दाखवण्याची संधी केंद्रातील सत्ताधारी पक्ष आणि समर्थक यांनी साधली. निमित्त झालं, राहुल गांधी यांनी त्यांच्या वायनाड मतदारसंघात केलेल्या दौ्याचं आणि त्याआधी त्यांच्या कार्यालयावर झालेल्या हल्ल्याचं! तर, झालं असं की, राहुल गांधी यांच्या वायनाड येथील कार्यालयाची मोडतोड काही तरुणांनी केली. पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या क्षेत्रांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीवर राहुल गांधी यांनी भूमिका घ्यावी, अशी मागणी स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडियाच्या कार्यकर्त्यांनी केली होती. या मागणीसाठीच त्यांनी कार्यालयाची तोडफोड केली. या घटनेनंतर राहुल गांधी वायनाड येथे आपल्या मतदारसंघाच्या दौऱ्यावर गेले होते. त्या वेळी पत्रकारांनी त्यांना या हल्ल्याबाबत प्रश्न विचारला. त्यावर प्रतिक्रिया देताना राहुल गांधी म्हणाले की, हे माझं कार्यालय असण्याआधी वायनाडच्या लोकांचं कार्यालय आहे. जे काही झालं ते दुर्दैवी आहे. हिंसेनं समस्येचं निराकरण होणार नाही. ज्यांनी हे केलं, ती लहान मुलं आहेत. त्यांचा



मार्ग चुकला असला, तरी माझं त्यांच्याशी काहीच वैर नाही. काँग्रेसच्या मुशीतून घडलेला कोणताही सच्चा कार्यकर्ता अशीच प्रतिक्रिया देईल. पण खरं नाट्य सुरू झालं, ते यापुढेच!

या प्रतिक्रियेतील 'जिन भी बच्चों ने यह किया, वह भी बच्चे हैं. यह सही तरीका नहीं हैं लेकिन मेरी उनसे कोई दुश्मनी नहीं,' हा एवढाच भाग झी न्यूजचे अँकर रोहित रंजन यांनी आपल्या १ जुलैच्या प्राइम टाइमच्या कार्यक्रमात वेगळाच रंग देऊन चालवला. त्यांनी राहुल गांधी यांच्या दोन प्रतिक्रिया एकत्र करत राहुल गांधी जणू उदयपूर घटनेबद्दलच बोलत आहेत, असं भासवलं. जे काही झी न्यूजनं दाखवलं ती दुसऱ्याच्या- त्यातही सार्वजनिक जीवनातील एका व्यक्तीच्या- अभिव्यक्तीची यथेच्छ मोडतोड होती. त्यापैकी पहिल्या काही वाक्यांमधली प्रतिक्रिया राहुल गांधी यांनी उदयपूर घटनेबद्दलच दिली होती. त्यात 'देशात कसं विद्वेषाचं वातावरण पसरवलं जातंय,' याचाच उल्लेख होता. त्यानंतर 'लहान मुलं' हा उल्लेख असलेला वायनाड प्रकरणावरील प्रतिक्रियेचा भाग त्यावर जोडला गेला. पत्रकार रोहित रंजन एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी 'आता तुम्हीच ठरवा, हे मारेकरी लहान मुलं आहेत की, दहशतवादी,' असं आवाहन थेट प्रेक्षकांना केलं. गोष्ट एवढ्यावरच थांबली नाही. झी न्यूजने ही बातमी चालवल्यानंतर भाजपचा आयटी सेल कामाला लागला. त्यांनी ही एवढीच क्लीप काही मिनिटांतच व्हायरल केली. बातमीची सत्यासत्यता पडताळून घेणं 'पोस्ट ट्रुथ' कालखंडात लोक विसरलेच आहेत. त्यामुळे आपल्यासमोर येतंय, ते सगळंच खरं आहे हे मानून लोकांनीही राहुल गांधी यांना लक्ष्य करत टीका करायला सुरुवात केली. विशेष म्हणजे माहिती व तंत्रज्ञान खात्याचे राज्यमंत्री राज्यवर्धनसिंह राठोड यांनीही ट्वीट करत राहुल गांधी यांच्यावर टीका केली. साहजिकच झी न्यूज आणि पत्रकार रोहित रंजन यांच्याविरोधात देशभरातून तक्रारी दाखल झाल्या. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या प्रकरणामागील सत्यता लोकांसमोर आणण्याचा खूप प्रयत्न केला. पण भाजपच्या प्रचारयंत्रणेसमोर सत्य समोर यायला थोडासा वेळ लागतो. अनेक राज्यांमध्ये रोहित रंजन यांच्याविरोधात तक्रारी दाखल झाल्या. छत्तीसगड पोलिसांनी तर रोहित रंजन यांच्यावर वॉरंट बजावून, त्यांच्या गाझियाबाद येथील घरात जाऊन त्यांना अटक करण्याचाही प्रयत्न केला. हे सगळं सुरू असताना नूपुर शर्मा यांना भाजप आणि त्यांच्या समर्थकांनी ज्या पद्धतीने ढाल करून लपवलं आहे, तसंच काहीसं रोहित रंजन यांच्याबाबतही होताना दिसलं. त्यांच्या समर्थनासाठी अनेक जण पुढे आले. छत्तीसगड पोलिसांनी ही कारवाई उत्तर प्रदेशच्या हद्दीत घुसून केल्याने उत्तर प्रदेश सरकारने त्यावरही आक्षेप घेतला. एवढंच नाही, तर रोहित रंजन यांनी या अटकेच्या विरोधात सुप्रीम कोर्टात धाव घेतली आणि शुक्रवारी त्यांना दिलासाही मिळाला.

## प्रस्ताव फुटला म्हणतात!

देशाच्या केंद्रीय गृहमंत्र्यांशी पंगा घ्यायचा तर हिंमत लागेल. ही हिंमत केलीच असेल तर तो कोण असेल? हैदराबादमध्ये भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सुरू असताना, मोदी-शहांची उपस्थिती असताना असं घडावं हे आश्चर्यकारक म्हणायला हवं. अर्थात कोणा नारदाने कुजबुज केली. खरं-खोटं त्या नारदालाच माहिती असेल! शहानिशा कोणी केली नाही, कोणी करूही शकत नाही. तिथल्या माध्यम केंद्रातील कुजबुजीतून कळलं ते असं- राष्ट्रीय कार्यकारिणीच्या अखेरच्या दिवशी दोन महत्त्वाच्या बैठका होत्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा राजकीय प्रस्ताव मांडणार होते. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणाने कार्यकारिणीच्या बैठकीची सांगता होणार होती. नियोजित कार्यक्रम नीट पार पडला, त्यामध्ये कोणतीही गडबड झाली नाही. पण, राजकीय प्रस्ताव कार्यकारिणीसमोर मांडण्याआधीच तेलंगणाचे मुख्यमंत्री 'केसीआर' यांना माहिती होता म्हणतात. हा दावा फक्त नारदाचा आहे. या नारदाचे म्हणणे होते की, लेखी प्रस्तावाची मोबाइल फोनवरून छायाचित्रं काढली गेली आणि ती व्हॉट्सअ‍ॅप केली गेली.. तंत्रज्ञानाचा वापर कधीही, केव्हाही, कुठेही होऊ शकतो हे खरेच. भाजपच्या या राजकीय प्रस्तावात नेमकं काय लिहिलं होतं हे बहुधा फक्त शहा आणि केसीआर यांनाच माहिती. शहांनी प्रस्तावातील मुद्दे भाजप नेत्यांसमोर मांडले असतील. या प्रस्तावाची लेखी प्रत वा क्रमवार ठरावांची माहिती पत्रकारांना दिली गेली नाही. नारदाच्या दाव्यावर भाजप बोलण्याची शक्यता कमीच, कदाचित, 'केसीआर'च कधीतरी खुलासा करतील.

दोन दशकं सलग राज्याच्या तसेच देशाच्या सर्वोच्च सत्तास्थानी राहिलेले नरेंद्र मोदी हे जगातील एकमेव नेते आहेत. याबाबत त्यांनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांनाही मागे टाकलं आहे. क्लिंटन यांनीदेखील २० वर्ष सत्ता पदे भूषवली होती. दोन वेळा ते सिनेट सदस्य होते. तर, दोन वेळा राष्ट्राध्यक्ष. मोदी २००१ पासून गुजरातचे मुख्यमंत्री होते. मग, २०१४ मध्ये ते पंतप्रधान झाले. २०१९ च्या लोकसभेत भाजपला बहुमत मिळाले तर, २०२४ मध्ये तसेच झाले तर ते तिसऱ्यांदा पंतप्रधान होऊ शकतील. पण, सध्या मोदींची सत्तेवरील २० वर्षे भाजपकडून साजरी केली जात आहेत. त्यानिमित्ताने लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'मोदी ॅ२०' हे इंग्रजी पुस्तक प्रकाशित झालं आहे, त्याच्या विविध भाषांमधील आवृत्त्याही निघतील. या पुस्तकाच्या अनुवादांचे काम सुरू आहे. 'मोदी ॅ२०' या मोहिमेतून देशातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये भाजप दोन सभा घेणार आहे. पुढील दोन महिन्यांमध्ये किमान एक हजार सभा घेतल्या जातील. त्यानिमित्त प्रत्येक केंद्रीय मंत्र्याला किमान चार मतदारसंघांचा दौरा करावा लागणार आहे, तसेच, या सभांनाही उपस्थित राहावं लागणार आहे. या मोहिमेअंतर्गत बेंगळूरु आणि गुवाहाटी या दोन ठिकाणी सभा झालेल्या आहेत. जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये या सभांना अधिक गती दिली जाणार आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन १८ जुलै रोजी सुरू होत असून या काळात शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तीन दिवसांमध्ये देशाच्या वेगवेगळया भागांमध्ये सभा होतील. प्रत्येक जिल्ह्यातील दोन सभांपैकी एक सभा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी घेतली जाईल व दुसरी एखाद्या मोठया सभागृहात बुद्धिजीवींशी चर्चा असेल. या सभांमधून मोदी सरकारच्या योजनांची माहिती लोकांना दिली जाईल. विद्यार्थ्यांचा राजकीय कल कोणत्या पक्षाकडं आहे, मोदींविषयी त्यांना काय वाटते अशी भाजपच्या राजकारणासाठी अत्यंत उपयुक्त माहिती या सभांमधून मिळू शकेल. भाजपने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची तयारीही सुरू केली आहे. लोकसभा आणि राज्यसभेत मिळून भाजपचे सुमारे ४०० खासदार आहेत. प्रत्येक खासदाराला किमान एका लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी दिली जाईल. त्या-त्या लोकसभा मतदारसंघात भाजपला कमीत कमी मतदान झालेल्या वा भाजपला मतदान न झालेल्या बूथवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

## अग्रलेख : खड्ड्यांचा मार्ग!

कमालच आहे.. मुळात रस्त्यावरचे खड्डे हा चर्चा, चिंतेचा विषय होऊच कसा शकतो? त्यामुळे या विषयाला हात घालायचाच असेल तर चिंतन करा. त्यासाठीची योग्य वेळ कोणती तर वाहतूक कोंडीत अडकल्यावरची. एकदा का तुम्ही चिंतनात मग्न झालात की अनेक गोष्टींचा साक्षात्कार तुम्हाला आपसूक होत जाईल. हे खड्डे भ्रष्टाचाराचे प्रतीक नाहीत तर राज्याच्या देदीप्यमान परंपरेचा एक भाग असल्याचेही तुमच्या लक्षात येऊ लागेल. कोंडीत अडकलेली तुमच्या आजूबाजूंची वाहने जेव्हा थकून हॉर्न-वादन थांबवतील तेव्हा तुम्ही दीर्घ श्वास घेत चिंतनाला आणखी खोली प्राप्त करून दिलीत की ही परंपरा किती प्राचीन आहे याची जाणीव तुम्हाला हळूहळू होत जाईल. युवाल नोवा हरारी यांनी सेपियन्स या पुस्तकात सांगितल्याप्रमाणे इतिहासपूर्व काळातसुद्धा माणसे सर्वशक्तिमान प्राण्यांना पकडण्यासाठी कसे खड्डे खोदत, आजही हत्तीला पकडायचे असेल तर कसे खड्डे खोदले जातात हे तुम्हाला आठवू लागेल. आता तुम्ही म्हणाल की त्या आणि या खड्डय़ांचा काय संबंध? कुठे हत्तीसारखा अमर्याद शक्ती असलेला प्राणी व कुठे मानवप्राणी! तर अशी तुलना करण्याचे काही कारण नाही. आजच्या व्यवस्थेला मानवाला सर्वशक्तिमान होऊच द्यायचे नाही. त्याची गती मंदावली की तो हळूहळू दुबळा होत जातो. त्यामुळे तेव्हाचे व आताचे खड्डे वेगवेगळे दिसत असले तरी त्यामागचा कार्यकारणभाव एकच आहे हे चटकन तुमच्या ध्यानात येईल. प्रमत्त होऊन वेगाने दौडणाऱ्या शक्तीला रोखणे हेच सांप्रतकाळच्याही खड्डय़ांचे इतिकर्तव्य. त्यापुढे तुम्ही हतबल झालात की त्या खड्डय़ाच्या कर्त्यांकरवित्याला आनंदच होत असतो. तो तुम्हाला दिसत नाही हा तुमच्या दृष्टीचा दोष. आता तुमच्यातील काहींना असे वाटू शकते की ही तर व्यवस्थेने केलेली शिकारच. त्यामुळे संतापून तुम्ही व्यवस्थेच्या नावाने जरूर बोटे मोडू शकता. मात्र हा त्रागा हवेत बाण मारण्यासारखा. कारण व्यवस्था ही काही हाडामांसापासून तयार झालेली एखादी व्यक्ती किंवा प्रतिमा नाही. अनेकांच्या दृश्य, अदृश्य सहभागातून तयार झालेली ही व्यवस्था कुणालाच उत्तरदायी नसते. त्यामुळे मुंबई, ठाणे असो वा नागपूर दरवर्षी खड्डय़ांची घाऊक निर्मिती होत असते. या निर्मितीला कुणा एकाला जबाबदार धरणे अवघड जाते. ज्याचे जन्मदाते शोधता येत नाहीत त्या अनाथाच्या निर्मितीला निसर्ग जबाबदार हा आपल्याकडचा प्रचलित विश्वास. त्यामुळे व्यवस्थेतील सारे खड्डय़ांसाठी वरुणराजाला दोषी ठरवून मोकळे होतात. आरोपांना उत्तर देणे या राजाला जमत नाही, कारण 'पडल्या'खेरीज या राजाचा आवाजच येत नाही. त्यामुळेच या खड्डय़ांना जे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जबाबदार तेच पावसाला दोष देत पुढच्या वर्षी खड्डे पडू देणार नाही अशी ग्वाही देत असतात. त्यात राज्यापासून तर शहर, गावापर्यंतचे सारे आले. दुसरीकडे त्यांच्या मनात एकूण खड्डे किती, ते बुजवायला यंदा किती पैसे लागतील, त्यातले आपल्यापर्यंत किती येतील, दुसऱ्याच्या खिशात किती जातील याचा हिशेब सुरू असतोच.

चिंतन करता करता तुम्ही या आर्थिक मुद्दयावर जेव्हा येता तेव्हा आणखी चडफडता, पण त्याशिवाय तुमच्याकडे काही इलाज नसतो. मग नाइलाजाने तुम्ही मोठमोठयाने हॉर्न वाजवून जणू निषेध व्यक्त करता. वाहतुकीची कोंडी थोडी फुटली व वाहनाने वेग घेतला की तुमचे चिंतन आणखी वेग घेते. जो दुसऱ्यांसाठी खड्डा खोदतो, तोच एक दिवस त्यात फसतो अशी एखादी म्हणही तुम्हाला आठवू शकते. मग हे व्यवस्थेतले लोक आजवर का फसले नाहीत? प्रत्येक वेळी तेच तेच चेहरे का दिसत राहतात? या साऱ्यांना न फसण्याची किमया कशी साधली असेल? हे सारे सहीसलामत सुटतात व खड्डय़ांमुळे मरतात मात्र सामान्य, हा अन्याय नाही का? यासारखे अनेक प्रश्न तुमच्या मनात फेर धरू लागतात. त्या प्रश्नांमुळे आपल्याही मनात व्यवस्थेविषयी एक खड्डा निर्माण झाला अशी भावना मग घर करू लागते. संत तुकारामांसाठी मंबाजीने खड्डा खोदला, पण या संतश्रेष्ठांची शिकवण जनमानसात अधिक रुजली असाही विचार तुमच्या मनात तरळून जाऊ शकतो.

## थोडक्यात

## अभाविप भद्रावती तर्फे राष्ट्रीय विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** अभाविप भद्रावती शाखे तर्फे राष्ट्रीय विद्यार्थी दिवस व ७४ वा अखिल भारतीय विद्यार्थी स्थापना दिवस लोकमान्य विद्यालय भद्रावती येथे उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अभाविप गडचिरोली विभाग संघटन मंत्री शक्तीजी केराम वक्ते म्हणून लाभले होते व त्यांनी कार्यक्रमाला संबोधन केले. राष्ट्रीय विद्यार्थी दिवसा सोबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे चे स्थापना दिवस असल्याने याला वेगळा महत्त्व आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद हे देशातली नव्हे तर जगातील सर्वात मोठे छात्र संघटन आहे. अभाविप गेल्या ७४ वर्षां पासून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अविरत पणे काम करत आहे. ' ज्ञान-शील-एकता ' हे अभाविप चे त्री सूत्र आहे. अभाविप वेग-वेगळया आयामांच्या माध्यमातून देश भरात विद्यार्थ्यांच्या विकासा करिता व विद्यार्थ्यां मध्ये नेतृत्व घडवण्या करिता काम करते असे व्याख्यान व आजचा विद्यार्थी कसा आहे, कसा असला पाहिजे हे वक्त्यांनी विद्यार्थ्यां पुढे मांडले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून अमितजी गुंडावार, प्रमूख अतिथी म्हणुन लोकमान्य विद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सचिन सरपटवार सर व अभाविप भद्रावती शाखे चे अध्यक्ष प्रा. नितीन लांजेवार सर, भद्रावती नगरमंत्री जयेश प्रशांत भडगरे,यश चौधरी,गोपाल पारधे, वैभवी बेहरे, संस्कार झाडे, निविदिता मुजुमदार, छकुली बावणे, प्रियंका चौवरे, खुशी असावले, गुलशन आषटनकर व मयुर भडगरे उपस्थित होते.

## अमरनाथ यात्रेला गेलेले प्रवाशी सुरक्षित

**शकील खान**



**अकोला :** जम्मु काश्मिर मधील अमरनाथ गुहेजवळ शुक्रवारी(दि.८) मोठ्या ढगफुटीमुळे यात्रेकरी वाहुन गेल्याची माहीती मिळाली. या घटनेमध्ये सद्यास्थितीत जिल्ह्यातील कोणीही प्रवाशी नसल्याबाबत खात्री करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट शहर, पणज व हिवरखेड येथील एकूण २९ प्रवाशी अमरनाथ येथे दर्शनाकरीता गेलेले असुन सर्व प्रवाशी सुरक्षित आहेत. प्रवाशी रामबन जिल्ह्यातील चंद्रकोट या ठिकाणी सी.आर.पी.एफ.च्या कॅम्प जवळ असलेल्या यात्री निवासामध्ये सुखरुप आहेत. जिल्हा प्रशासनाचे वतीने निवासी उपजिल्हाधिकारी संजय खडसे यांनी जिल्ह्यातील अमरनाथ येथे गेलेल्या २९ प्रवाशाच्या पथकातील योगेश वाकोडे, मनिष डांबरे यांचेशी दुरध्वनीवर संपर्क साधला असुन २९ प्रवाशी सुरक्षित असल्याबाबत खात्री करण्यात आली आहे. तसेच अकोला येथील अमरनाथ यात्रा ग्रुप मधील सदस्य सुध्दा अमरनाथ दर्शनासाठी गेलेले प्रवाशी सुखरुप आहेत. या ग्रुपमधील शरद भेंडे यांचेशी सपर्क साधून त्यांचेसोबत असलेले १८ प्रवाशी सुखरुप आहे. अशाप्रकारे अकोला जिल्ह्यातील ४७ प्रवाशी सुरक्षित असल्याबाबत जिल्हा प्रशासनाव्दारे खात्री केली आहे.

अमरनाथ यात्रेच्या अनुषंगाने एन.डी.आर.एफ. हेल्पलाईन ०११-२३४३८५२ व ०११-२३४३८२५३, काश्मिर डिव्हीजनल हेल्पलाईन ०१९४-२४९६२४० क्रमांक जारी केले आहे. तसेच जिल्ह्यातील इतर कोणी प्रवाशी अमरनाथ यात्रेला गेले असल्यास त्यांचे नातेवाईकांनी जिल्हा प्रशासनाशी सपर्क करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## येवती येथे पावसाचा तांडव; शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

**वृषभ दरोडे**



**यवतमाळ :** राळेगाव तालुक्यातील येवती येथे पावसाने सुरवात केली आणि पावसाने खुप रूद्र रूप धारण केले. आजपर्यंत जवळपास विस वर्षात येवती येथे पुर आला नाही तेवढा दि.आज ९ तारखेला भयानक पुरस्थिथी निर्माण झाली. येवती येथे अनेक लोकांच्या शेतात पूर गेल्याने शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले , शेतातील पीक पाण्यामुळे खरंडुन गेली आहे. येवती येथे आज पर्यंत विस वर्षात कधी पुर आला नाही तेवढा यावर्षी दि. ९ तारखेला पुर आला आहे. तरी येवती येथे पुरपरीस्थीतीची पाहणी करून वरीष्ठ अधिकारी यांनी झालेल्या नुकसानाची भरपाई ज्या शेतकऱ्याचे नुकसान झाले त्यांना आर्थीक मदत जाहिर करावी अशी जनतेची मागणी आहे.

## रस्त्यावर घाणीचे साम्राज्य; परिसरात पसरली दुर्गंधी

**राजरत्न जाधव**



**पालधर :** बोईसर परिसरात ठीक ठिकाणी कचऱ्याचे ढीग लागलेले दिसून येत आहेत. त्यामुळे ते कुजून रोगराई पसरण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे बोईसर परिसरात कचरा रोजचा रोज न उचलता तो जागेवरच पडलेला दिसून येतो. परिसरातील नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करून देखील हा कचरा उचलला जात नाही गणेश नगर रामचंद्र नगर राणी शेगाव रोड रस्त्यावरील कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून. रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांना त्रास होत आहे. परंतु बोईसर ग्रामपंचायतचे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात या ठिकाणी पाणी साचते त्यामुळे कचरा कुजून रोगराई पसरण्याची शक्यता वाढली असून याकडे त्वरित लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे नागरिकाकडून बोलले जात आहे.

## जि. प. पं. स. पदाधिकारी निवड प्रक्रियेला स्थगिती हि गैरकायदेशीर : सौ.प्रतिभाताई भोजने

**विकास ठाकरे**



**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाचे दि. ८ जुलै २०२२ रोजीच्या पत्रानुसार जि. प. अध्यक्ष, उपाध्यक्ष पं. स. सभापती व उपसभापती निवड प्रक्रियेला वरिष्ठांच्या सुचनेनुसार तात्काळ स्थगिती देण्यात यावी असे आदेशीत करण्यात आले हि गैरकायदेशीर आहे व ग्रामविकास मंत्री यांची अद्याप निवड झाली नसल्याने हे खाते मा. मुख्यमंत्री यांच्याकडे आहे तेव्हा सदर पत्रा कुठल्या वरिष्ठांच्या निर्देशानुसार आहे त्याचा कुठल्याही खुलासा किंवा संदर्भ सदर पत्रात नमूद नसल्यामुळे व जि. प. पं. स. अधिनियम कलम ४३ नुसार सदर आदेश गैरकायदेशीर आहे. असे निवेदन अकोला जिल्हा परिषद अध्यक्ष मा. सौ प्रतिभाताई भोजने यांनी मा. जिल्हाधिकारी निमा अरोरा यांना देण्यात आले ह्यावेळी जि. प. अध्यक्ष सौ. प्रतिभाताई भोजने, जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जेष्ठ विधीज्ञ ॲड. संतोष राहाटे, समाजकल्याण सभापती आकाश शिरसाट, सह जिल्हा प्रसिध्दी प्रमुख विकास सदांशिव, जि. प. सदस्य शंकरराव इंगळे आदी उपस्थित होते.

## रोटरी क्लब अकोला ग्रॅग्रोसिटी च्या वतीने श्री समर्थ पब्लिक स्कूल येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**अभिजीत फंडाट**



**अकोला :** रोटरी क्लब ऑफ अकोला ग्रोसिटी च्या वतीने श्री समर्थ पब्लिक स्कूल,रिधोरा रोड येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक नितीन बाठे हे होते सोबत रोटरी क्लब ऑफ अकोला ग्रोसिटीचे अध्यक्ष एडवोकेट देवाशिष काकड, सचिव नीरज देशमुख व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत आयुर्वेदात उपयोगी असलेल्या विविध वृक्षांची लागवड या वृक्षारोपण कार्यक्रमात करण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राध्यापक नितीन बाठे यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्याची जबाबदारी ही आपल्या पिढीवर असून येणाऱ्या पिढीला आपण एक स्वच्छ व निर्मळ वातावरण देणे हे आपले कर्तव्य असून या कार्यात नव्या पिढीने उत्साहाने भाग घ्यावा असे प्रतिपादन केले. रोटरी क्लब ऑफ अकोला ग्रोसिटीचे अध्यक्ष एडवोकेट देवाशीष काकड यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी या तुकोबा रायांच्या अभंगाला स्मरून वृक्ष हे मनुष्याचे मित्र असून पर्यावरणाचा रास रोखण्याकरिता वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे व रोटरी क्लब ऑफ अकोला ग्रोसिटीच्या माध्यमातून अनेक ठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्याचा मानस व्यक्त केला व नव्या पिढीला पर्यावरण संवर्धनाची शपथ देण्याचा कार्यक्रम प्रत्येक शाळेमध्ये घेणार असल्याचे कळवले. रोटरी क्लबचे सदस्य मयूर देशमुख यांनी सर्व उपस्थितांना वृक्षांच्या विविध प्रजाती व वनौषधी संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. रोटरी क्लब ऑफ अकोला ग्रोसिटीचे पर्यावरण समितीचे अध्यक्ष विवेक झापर्डे यांनी क्लबच्यावतीने दुर्गम भागात व जिल्हा परिषद च्या शाळांमध्ये जाऊन वृक्षारोपण करण्याचा व वृक्ष संवर्धनाकरिता विद्यार्थ्यांना सोबत जोडण्याचा मानस व्यक्त केला. याप्रसंगी क्लबचे चार्टर प्रेसिडेंट अतुल चौधरी, एडवोकेट आनंद गोदे,डॉ ज्ञानसागर भोकरे ,गुणवंत देशपांडे, सुनील घोडके , एडवोकेट राजेश अकोटकर ,नारायण कळमकर, सोमेश्वर रत्नपारखी, एडवोकेट संतोष पाटील, राजेश राऊत, शशांक जोशी, आशिष धाडे ,अमित कोल्हटकर, संगीता चौधरी, अर्चना पाटील, अश्विनी भोकरे, संपदा जोशी, दिपाली रत्नपारखी, सुनीता देशपांडे, प्रेरणा घोडके, संध्या अकोटकर, ज्योती कळमकर,मुक्ता धाडे, अभिजीत कडू, अभिजीत आखरे आनंद थोटांगे, आशिष वानखडे, सागर जोशी, विधीश साकरकार, मंदार वखरे ,अमोल बोचे, डॉ पार्थ गवात्रे, गणेश सारसे, श्रीकांत हांडे, जितेंद्र देशमुख, कौशल वानखडे, राहुल केकान ,डॉ सौरभ बोराखडे, वैभव मेहरे, विवेक झापर्डे ,वसंत खराडे, राज ईश्वरकर, दीपक वानखडे, दिलीप देशमुख,अनंता ठाकरे, मयूर देशमुख, तुषार मुऱ्हेकर,श्रीकांत देशमुख, प्रसाद देशमुख हे सर्व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाला श्री समर्थ पब्लिक स्कूलच्या सर्व कर्मचारी वृंद व विद्यार्थी यांचा विशेष सहयोग लाभलाकार्यक्रमाचे संचालन सचिव नीरज देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन कौशल वानखडे, जितेंद्र देशमुख यांनी केले.

## संजय राय यांची जिल्हा सहसंयोजक पदी नियुक्ती

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** येथील युवा कंत्राटदार तथा भाजपा कार्यकर्ते संजय राय यांची भाजपा उत्तर भारतीय मोर्चा युवा प्रकोष्ठच्या जिल्हा सहसंयोजकपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती भाजपा उत्तर भारतीय मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. संजय पाण्डेय यांनी केली. त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे भाजपा, भाजयुमो व भाजपाच्या विविध आघाड्यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे. संजय राय यांचा विविध सामाजिक व धार्मिक संस्थांशी अगदी जवळचा संबंध आहे. त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत केले जात आहे.

## विमानतळाचे काम तीन महिन्यात सुरु करा; आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** आदिवासी बहुल आणि नक्षलग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळावी यादृष्टीने तसेच जगभरातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या आणि वाघांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील मौजा विहीरगाव व मुर्ती येथे प्रस्तावित विमानतळाचे काम येत्या ३ महिन्यात सुरु व्हावे, यासाठी आवश्यक सर्व प्रशासकीय मान्यतांची तातडीने पूर्तता करावी अशा सूचना माजी अर्थमंत्री आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आज महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

मौजा विहिरगाव व मुर्ती येथे विमानतळ व्हावे यासाठी दिनांक २४ एप्रिल, २०१६ ला प्रशासकीय मान्यता मिळाली होती. याकरिता शासनाकडून ४६ कोटी रुपये मंजूर झाले; यामध्ये ४१ कोटी रुपये जमीन अधिग्रहण व ५ कोटी रुपये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यासाठी तरतुद करण्यात आली होती. विमानतळाकरिता एकूण ८४० एकर जमीन आवश्यक होती. त्यात पहिल्या टप्प्यामध्ये ७२० एकर जमीन अधिग्रहीत करून २५०० मीटरच्या धावपट्टीचे काम निर्माणाधीन असेल व दुसऱ्या टप्प्यानंतर धावपट्टीची लांबी ३००० मीटर होईल असा प्रस्ताव आहे.परंतु, प्रशासकीय मान्यतेनंतरही अनेक वर्षांपासून या प्रकल्पाकडे राज्य शासनाचे दुर्लक्ष होते, विमानतळाच्या कामाला होत असलेल्या दिरंगाईची गंभीर दखल घेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बुधवार, दिनांक ६ जुलै २०२२ रोजी विधानभवनात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून सविस्तर चर्चा केली. प्रकल्पाशी संबंधित अडचणी समजून घेतल्या; वन विभागाशी संबंधित असलेल्या समस्यांवर देखील मार्ग काढून या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.महाराष्ट्र शासनाकडून चंद्रपूर विमानतळाच्या कामासाठी स्थगिती दिल्याचे दिसून आल्याचे लक्षात आल्याने तातडीने ही स्थगिती उठवून कामाला गती देण्याच्या स्पष्ट सूचना आ. मुनगंटीवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. येत्या ऑक्टोबर महिन्यात विमानतळाचे भुमीपूजन होईल या दृष्टीने वेगाने पावले उचलण्याचेही त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. या बैठकीला वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, मुख्य वनसंरक्षक तथा सहसचिव रविकिरण गोवेकर, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे मंगेश कुलकर्णी, चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक प्र. ज. लोणकर आदी अधिकारी उपस्थित होते.

## शिवसेनेचे १४ खासदारही बंडाच्या तयारीत

**साप्ता. अधिकारनामा**



**मुंबई :** शिवसेनेतील ४० आमदारांपाठोपाठ आता शिवसेनेचे १८ पैकी १४ खासदारही एकनाथ शिंदे गटात जाणार असल्याची दाट शक्यता आहे. तर पुढील आठवड्यात होणाऱ्या राष्ट्रपतीपदासाठी निवडणुक होत आहे. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत खासदारांनी एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठींबा देण्याची शिवसेना पक्षप्रमुखांकडे मागणी केली आहे. गेल्या आठवड्यात शिवसेनेचे खासदार राहुल शेवाळे आणि राजेंद्र गावित यांनी ठाकरे यांना पत्र लिहून मुर्मू यांना पक्षाने पाठिंबा देण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर निणऱ्य घेण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पक्षाच्या खासदारांची बैठक बोलावली आहे. मिळालेल्या बातमीनुसार भाजपबरोबर सत्ता स्थापन करावी यासाठी शिवसेनेचे १४ खासदार बंडाच्या तयारीत आहेत. त्यासाठी १३ किंवा १४ जुलै रोजी हे खासदार वेगळा गट म्हणून मान्यता द्यावी यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे मागणी करणार आहेत.

याआधी शिवसेनेतील १५ खासदार एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा सुरू आहे. या संदर्भात प्रसार माध्यमांनी लोखंडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ठोस काही सांगितले नाही. तथापि, अनेक खासदार भाजपसोबत जाण्याची मागणी करत होते. ज्यांच्याविरोधात आपण लढलो, ते मजबूत होत आहेत. आपण मात्र कमकुवत झालोय, अशी खंत खासदारांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे बोलून दाखवल्याचे लोखंडे यांनी सांगितले. दरम्यान, सिंधुदुर्गचे शिवसेना खासदार विनायक राऊत यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, ही बैठक दुपारी १२ वाजता होणार आहे. ते म्हणाले, “या बैठकीचा अजेंडा हा १८ जुलै रोजी होणाऱ्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीबाबत पक्षाच्या भूमिकेवर चर्चा करणे असेल.” याआधी शिवसेनेच्या काही खासदारांनी पक्ष नेतृत्वाला राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्यास सांगितले होते. यापूर्वी शिवसेनेने एनडीएशी संबंध तोडून प्रतिभा पाटील आणि प्रणव मुखर्जी या दोन्ही कॉंग्रेस नेत्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता.

## दारू हात भट्टी वर छापा 33४00 रुपयाचा माल जप्त

**विकास ठाकरे**



**अकोला :** जिल्ह्यातील पिंजर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये येत असलेल्या कानडी बाजार येथे दि.१० रोजी पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार अजय कुमार वाढवे यांना कानडी बाजार येथे गावामध्ये राहत्या घरी हातभट्टी चालू असल्याचा सुगावा लागला. लगेच पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल होऊन आरोपी पोपा विठ्ठल सोळंके, मीना देविदास पवार वय ४० वर्षे दोघे राहणार कानडी बाजार, यांना रंगेहात पकडले असता त्यांच्याकडून मोहाचा सडवा माल, मोह माच डबे, व गावठी हातभट्टी दारू असा ३३ हजार ४०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. तसेच अशोक पवार राहणार कानडी यांचेकडून गुटखा तंबाखू जन्य पदार्थाचे पॉकेट जप्त करण्यात आले त्या मालाची किंमत ९ हजार ७२० हाही जप्त करण्यात आला पिंजर पोलीस स्टेशन ने अवैद्य धंदे पकडण्याचा सपाटा सुरू केला आहे त्यामुळे अवैध धंदेवाल्यांची धाबे दणाणले आहेत. ही कार्यवाही पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार अजयकुमार वाढवे, बीट इन्चार्ज राजू वानखडे, अभिजीत शिरसाट, कथे यांनी केली आहे.

## एकलव्य युवा संघटनेतर्फे वृक्षारोपण

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** सामाजिक कार्यकर्ते बाबुभाई सय्यद यांच्या वाढदिवसानिमित्त येथील एकलव्य संघटनेतर्फे येथील ग्रामीण रुग्णालयात नुकताच वृक्षारोपण व मेडिकल प्लांट कुंड्या वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सिकंदर भाई शेख, पप्पूभाई शेख, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सिंग, एकलव्य युवा संघटनेचे अध्यक्ष प्रितम देवतळे, उपाध्यक्ष वैभव मेश्राम, बाबूभाई सय्यद, प्रशांत लांडगे, प्रफुल्ल भोस्कर, गणेश पचारे, अभिषेक घुबडे तथा एकलव्य संघटनेचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नशीब बलवत्तर म्हणून वाचले पाच जणांचे प्राण

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** सध्या पावसाने संपूर्ण महाराष्ट्रात दमदार बॅटींग चालू केली असून सर्वत्र पावसाचा कहर असताना नशीब बलवत्तर म्हणून पाच जणांचे प्राण वाचल्याची खळबळजनक घटना भद्रावती तालुक्यात दि.९ जुलै रोजी घडली.प्राप्त माहितीनुसार,दि.९ जुलै रोजी टाटा मॅजिक ऑटो भद्रावती वरून तालुक्यातील पानवडाळा येथे जात होता. या ऑटोत चालकासह पाच प्रवाशी प्रवास करीत होते. दरम्यान, दुपारी २ वाजताच्या सुमारास टाकळी-पानवडाळा या रस्त्यावर असलेल्या पुलावरून पाणी वाहत असताना ऑटो चालक डेकाटे याने पुलावरून ऑटो पुढे दमटला. त्याचवेळी पाण्याचा प्रवाह वेगाने आला आणि ऑटोला नदीपात्रात घेऊन गेला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. सर्वजण जिवाच्या आकांताने ओरडू लागले. त्या पाच पैकी एकाने प्रसंगावधान राखून ऑटो वाहायला लागताच ऑटोतून उडी मारुन स्वतःचा बचाव केला. तर उर्वरीत चार जण ऑटोमध्येच अडकून पडले. वाचवा-वाचवा अशी ओरड चालू असतानाच टाकळी आणि पानवडाळा या दोन गावातील नागरिक घटनास्थळी जमा झाले. त्यापैकी एकाने पानवडाळा येथील सुधाकर काळे यांच्या मोठ्या मुलाला भ्रमणध्वनीवरून ऑटो नदीत बुडाल्याची माहिती दिली. त्या मोठ्या मुलाने आपला लहान भाऊ निखिल सुधाकर काळे याला माहिती देताच तो क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी दाखल झाला. लगेच त्याने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पाण्यात उडी घेतली व एकाएकाला बाहेर काढून दोराच्या सहाय्याने काठावर आणले. निखिलला पोहता येत नव्हते, तरी केवळ दुस-यांचा जीव वाचविण्याच्या ईर्षेने त्याने पाण्यात उडी घेतली होती. निखिल हा भारतीय लष्करात सैनिक असून तो आपल्या पानवडाळा या गावी सुट्टीवर आला आहे. भद्रावती येथील शिंदे महाविद्यालयात त्याने बी.ए.प्रथम वर्षाचे शिक्षण घेतल्यानंतर तो सैन्यात भरती झाला. ३० वर्षीय निखिल मागील ११ वर्षांपासून सैन्यदलात कार्यरत आहे. त्याने दाखवलेल्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र पुलावरून पाणी वाहत असताना बेजबाबदारपणे वाहन टाकणा-या अशा वाहनचालकांवर कारवाई करण्यात यावी अशीही मागणी नागरिक करीत आहेत. चूक चालकाची आणि इतर प्रवाशांचा नाहक जीव गेला असता अशीही चर्चा आता रंगू लागली आहे.

## महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ जागतिक दर्जाचे व्हावे – देवेंद्र फडणवीस

**साप्ता. अधिकारनामा**

**नागपूर :** न्याय विधि क्षेत्रात वैश्विक मान्यता असणारे मनुष्यबळ नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठातून तयार होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय विधि विद्यापीठ त्यासाठी सहाय्यक ठरावे, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुलामुलींचे वसतिगृह व सुविधा केंद्राचे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. नागपूर येथील बुटीबोरी परिसरातील वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या परिसरात आयोजित या सोहळ्यात आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तसेच या विद्यापीठाचे कुलपती भूषण गवई यांच्या हस्ते मुलामुलींच्या वेगवेगळ्या वसतिगृहाचे व सुविधा केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना फडणवीस यांनी मुख्यमंत्री असतानाच्या काळापासून पक्षीय मतभेद सोडून राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी काम केले असल्याचे त्यांनी सांगितले. यापुढेही निधीची कमतरता पडू देणार नाही.

येणाऱ्या पिढीसाठीचे हे काम असून दर्जेदार मनुष्यबळ निर्मितीची बीज पेरणी या माध्यमातून करायची आहे. दर्जेदार मनुष्यबळ व शैक्षणिक सुविधा, आर्थिक विकासाचा मूलमंत्र आहे. ज्या ठिकाणी शैक्षणिक दर्जा उत्तम असतो. त्या ठिकाणी विकास दिसून येतो. या विद्यापीठाच्या विकासाचा पुढील काही वर्षांचा रोड मॅप तयार करा. या विद्यापीठाला पायाभूत सुविधांसाठी यापुढे कर्ज घ्यावे लागणार नाही. शासन भक्कमपणे आपल्या पाठीशी उभे आहे, असे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, “वसतिगृह केवळ शैक्षणिक प्रगतीच करत नाही. तर ते प्रेरणादेखील निर्माण करतात. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिकत होते. त्या संस्थेमध्ये आजही त्यांचे नाव सन्मानाने व आदरपूर्वक घेतले जाते. त्यामुळे हे वसतिगृह आपल्या अस्तित्वातून मोठे करा.” लंडन येथे बाबासाहेब शिकत असलेल्या घराची खरेदी मुख्यमंत्री असतांना राज्य शासनाने केली असल्याची आठवण त्यांनी यावेळी सांगितली.

## थोडक्यात

# अतीवृष्टी मुळे माजरी परीसरातील जनजीवन विस्कळीत

**महेश निमसटकर**



**भद्रावती :** तालुक्यात सततच्या पावसामुळे ग्रामीण भागातील जनजीवन विसकळीत झाले असुन सर्वत्र पूर परस्थितीचा सामना करावा लागत आहे. तालुक्यातील माजरी परीसरात शिरना नाल्याला पुराचे पाणी वाढल्यानेमाजरी,पळसगाव,चालबर्डी,कोंढा या गावाचा वणी, वरोरा, भद्रावती या शहराशी संपर्क तुटला असुन सर्व येण्या - जाण्याचे मार्ग बंद झाले आहेत. माजरी वे. को. लि. ने नागलोन खुल्या खाणीतुन निघणाऱ्या ओबीचे ढीगारे शिरना नाल्याच्या काठा लगत टाकले असल्या मुळे शिरना नदीला येणाऱ्या पुराचे पाणी हे माजरी, पळसगाव या गावात घुसण्याची दाट शक्यता आहे. या पुराच्या पाण्यामुळे या परीसरातील शेतातील कापूस, सोयाबीन पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून वे. को. लि. ने झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी करीत आहे.

# स्पाईसजेट विमानांमागे बिघाडाची साडेसाती कायम

**साप्ता. अधिकारनामा**



**नवी दिल्ली :** गेल्या २४ दिवसात संबंधित कंपनीच्या विमानात तब्बल ९ वेळा बिघाड होण्याच्या घटना घडल्या आहेत. याचा नाहक त्रास प्रवाशांना झाला आहे. स्पाइसजेटच्या विमानांमध्ये खराबी होण्याच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाही. आजही स्पाईजजेटच्या दुबई-मदुराई बोईंग बी ७३७ विमानामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे विमानाच्या उड्डाणाला विलंब झाला. डीजीसीए अधिकाऱ्याने सांगितले की, व्हीटी-एसझेडके नोंदणी क्रमांक असलेल्या बोईंग बी ७३७ मॅक्स विमान मंगळुरुहून दुबईकडे जाणार होते. त्यावेळी संबंधित विमानाची पाहणी केली असता विमानाचे समोरचे चाक नेहमीपेक्षा अधिक दाबलेले दिसून आले. त्यानंतर विमानाला उड्डाण न करण्याचा निणऱ्य घेण्यात आला.

स्पाईसजेटच्या फ्लाइटमध्ये अलीकडील काळात मोठ्या तांत्रिक समस्यांचा सामना करावा लागत आहेत. स्पाइसजेटच्या विमानात तांत्रिक बिघाडाची गेल्या २४ दिवसांतील ही नववी घटना आहे. वारंवार घडणाऱ्या अशा प्रकरच्या घटनामुळे ६ जुलै रोजी, डीजीसीएने स्पाइसजेटला कारणे दाखवा नोटीस देखील जारी केली होती. ज्यामध्ये कंपनी सुरक्षित, कार्यक्षम आणि विश्वासाऱ्ह हवाई सेवा स्थापन करण्यात अपयशी ठरल्याचे नमुद करण्यात आले होते.

# सप्तश्रृंगी मंदिर तब्बल 45 दिवस राहणार बंद

**साप्ता. अधिकारनामा**



**नाशिक :** श्री भगवती स्वरुप व मूर्ती देखभाल संदभिऱ्य पुर्तता करण्यासाठी २१ जुलै ते ५ सप्टेंबर २०२२ या ४५ दिवसांच्या कालावधीत सप्तशृंगी गड वणी येथील श्री भगवती मंदिर बंद राहणार असल्याची माहिती विश्वस्त मंडळाकडून देण्यात आलेली आहे. वर्ष २०१२-१३ पासून श्री भगवती स्वरुप, मुर्ती संवर्धन व देखभाल कामकाजाच्या अनुषंगाने नियोजन सुरु असून, सद्द्यस्थितीत कार्यरत असलेले अध्यक्ष व विश्वस्त मंडळ यांनी शासनाच्या पुरातत्व विभाग, आय आय टी पवई (बॉम्बे) यांसह मे. अजिंक्यतारा कन्सल्टंसी, नाशिक यांच्या मार्फत संदभिऱ्य पुर्ततेकामी तज्ञ मार्गदर्शन प्राप्त करुन श्री भगवती स्वरुप, मुर्ती संवर्धन व देखभाल संबंधीत पुर्तता होणे दृष्टीने अंतिम निर्णय घेतला आहे. त्यानुसार श्री भगवती स्वरुप, मुर्ती संवर्धन व देखभाल अनुषंगीक पुर्ततेसाठी गुरुवार २१ जुलै पासून पुढील ४५ दिवस श्री भगवती मंदिर भाविकांसह सर्वांना प्रत्यक्ष दर्शनासाठी संपुर्णतः बंद राहणार आहे.

मात्र विश्वस्त संस्थेच्या पहिली पायरी येथे असलेल्या उपकार्यालय नजीक श्री भगवतीची हुबेहुब प्रतिकृती भाविकांच्या पर्यायी दर्शनाची व्यवस्था म्हणून कार्यरत केली जाणार आहे. तसेच भाविकांना दिल्या जाणाऱ्या महाप्रसाद, भक्तनिवास व इतर अनुषंगीक सुविधा या सातत्यपूर्वक कार्यरत असणार असल्याची माहिती विश्वस्त मंडळाकडून देण्यात आली आहे.

# भारत-इंग्लंड आमने-सामने

**साप्ता. अधिकारनामा**

**वृत्तसंस्था :** शेवटचा कसोटी सामना गमाविल्यानंतर भारताने टी-२० मालिकेत इंग्लंडला त्यांच्याच घरात पराभूत करण्याची कामगिरी केली. दरम्यान आता दोन्ही संघांमध्ये ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला मंगळवारपासून सुरुवात होत आहे. रोहित विरुद्ध जोस असा विस्फोटक; परंतु धावांसाठी झगडणाऱ्या फलंदाज आणि कर्णधारांमधील ही झुंज त्यानिमित्त क्रीडाप्रेमींना पाहायला मिळणार आहे. मंगळवारी द ओव्हलच्या मैदानात भारत आणि यजमान इंग्लंड यांच्यात मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना होणार आहे. एकमेव कसोटी यजमानांनी जिंकल्यानंतर टी-२० मालिका भारताने खिशात घातली आहे. त्यामुळे आता एकदिवसीय मालिका कोण जिंकणार? याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे. टी-२० मालिकेतील नेतृत्वच दोन्ही बाजूने कायम असले, तरी दोन्ही कर्णधार धावा जमविण्यात धडपडताना पाहायला मिळत आहेत. त्यातल्या त्यात रोहितने थोड्या फार तरी धावा केल्यात, मात्र जोस बटलर पूर्णपणे अनफॉर्ममध्ये आहे. हार्दिक पंड्या, सूर्यकुमार यादव यांचा फॉर्म भारतासाठी जमेची बाजू आहे. हार्दिक दोन्ही आघाड्यांवर यशस्वी ठरला आहे, तर सूर्यकुमारनेही मालिकेतील शेवटच्या टी-२० सामन्यात शतक झळकावून प्रभावित केले आहे. त्यामुळे भारताला तशी धावांची चिंता नाही. अडचणीच्या वेळी धावून येणाऱ्या फलंदाजांची संख्या भारताकडे अधिक आहे. दुसरीकडे धावा जमविण्यात आलेल्या अपयशाने इंग्लंडची डोकेदुखी वाढली आहे. ही कसर त्यांनी मालिकेतील शेवटच्या सामन्यात भरून काढली आहे. लिव्हिंगस्टोनची तुफानी फलंदाजी सर्वांनाच अवाक करून गेली. असे असले तरी त्यात सातत्य राखण्याचे आव्हान यजमानांसमोर आहे.

# जय हरी विठ्ठलच्या जयघोषात दुमदुमली भद्रावती

**महेश निमसटकर**







**भद्रावती :** आषाढी एकादशी महोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या विठ्ठल रखुमाई पालखीच्या शोभायात्रेतील जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषाने भद्रावती दुमदुमली. श्री विठ्ठल मंदिर देवस्थान कमिटी किल्ला वॉर्ड भद्रावती तर्फे आषाढी एकादशी महोत्सवानिमित्त सोमवारी विठ्ठल रखुमाईची शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेचे उद्घाटन नगराध्यक्ष अनिल धानोरकर व ठाणेदार गोपाल भारती यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते बळवंतदादा गुंडावार, मनोहरराव पारधे तसेच कमिटीचे चंद्रकांत गुंडावार, सुरेश परसावार,अशोक उपलांचीवार, राजेश्वर मामीडवार , समीर उपलांचीवार, विशाल गावंडे, गोपाल ठेंगणे, उल्हास भास्करवार, अविनाश पामपट्टीवार, भोपे महाराज उपस्थित होते. विठ्ठल मंदिर, भोजवार्ड,जंगल नाका ,जुना बस स्टॅन्ड ते विठ्ठल मंदिर पर्यंत शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभायात्रेत लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय भद्रावतीच्या च्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. शोभायात्रेत सर्वप्रथम घोष पथक, लेझीम पथक, पाऊले पथक, झेंडा पथक, तसेच विठ्ठल रुक्मिणी ,संत ज्ञानेश्वर व संत तुकारामाच्या झाक्या तसेच विठ्ठल रखुमाई ची पालखी लक्ष वेधून घेत होती.शोभायात्रेदरम्यान ठीक ठिकाणी विठ्ठल रखुमाईची लोकांनी पूजाअर्चा केली. या प्रसंगामुळे भद्रावतीतच पंढरपूर अवतरल्याच्या भावना निर्माण झाल्या होत्या. शोभा यात्रेत प्रियदर्शनी आयटीआय च्या विद्यार्थ्यांचाही समावेश होता.रविवारी विठ्ठल रखुमाई मूर्तीची महापूजा व अभिषेक करण्यात आला.रात्री राष्ट्रीय कीर्तनकार शाम धुमकेकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यांना साथ सरपटवार परिवार व संच, भद्रावती यांची लाभली. शोभायात्रेत बारा भजन मंडळी सहभाग घेतला होता. शोभायात्रेनंतर कीर्तन व गोपाल काला तसेच महाप्रसादाने संपूर्ण कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी प्राचार्य आशालता सोनटक्के, सचिन सरपटवार, पर्यवेक्षक रूपचंद धारणे, मधुकर सावनकर, लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच असंख्य भद्रावतीकर उपस्थित होते.

# भावंडाना बुडतांना बचाव पथकाने दिले जिवदान

**विकास ठाकरे**



**अकोला :** त्यांच्या जिवणातील शेवटचे काहीक्षण बाकी असतांनाच दोन्ही भावंडानी आता आपण बुडणार म्हणून एकमेकांना मिठी मारली अगदी कपाळापर्यंत बुडालेल्या अवस्थेत असतांनाच पिंजर जिल्हा अकोला येथील मानवसेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशनच्या संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाच्या जवानांनी चक्क मृत्यूच्या दाढेतुन खेचुन काढले. आज इस्कॉन घाटाच्या डाव्याबाजूला नदीच्या काठावर उभे असलेले वारकरी आरडाओरडा करत धावा धावा असे जोर जोरात ओरडु लागले.लगेच तेव्हा जिवरक्षक दीपक सदाफळे आणी टीम यांनी मागे पाहताच दोन भाऊ चंद्रभागा नदीच्या मध्यभागातुन पोहत येत असतांना मधातच दम सरला आणी दोघेही बुडायला लागले खुप प्रयत्न करत होते परंतु शेवटी तीथेच दम सरल्याने दोघांनाही गटांगळ्या खायला सुरवात झाली याच वेळी आता आपले काही खरे नाहीं अशी खात्री होताच दोघाही भावंडानी एकामेकांना मिठ्या मारुन पकडले तेव्हा कोणी मदतीला धावून येईल तरच आपण जिवंत राहु अशी परीस्थिती त्यांच्या हालचाली वरुन जाणवत होती.अगदी जिवनातील शेवटचे काही क्षण व सेकंद बाकी अन शेवटच्या क्षणीच वारक-यांच्या रक्षणासाठी तैनात असेले संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाचे जवान दोन्ही भावंडे बुडतांनाच्या अवस्थेत पाण्याखाली जाताच त्यांच्यावर तुटून पडले आणी चक्क मृत्यूच्या दारातुन दोघांनाही सुखरुप ओढुन काढले.

क्षणातच जिवरक्षक दिपक सदाफळे यांनी आपली रेस्क्यु बोट त्या दीशेने वळविली आणी लगेच टॉपर अंडर वॉटर स्विमर पथकाचे जवान ज्ञानेश्वर म्हसाये,अतुल उमाळे, यांना स्टॅण्डबाय होऊन पोजिशन घ्यायला सांगितले.आणी दुसरे बोट मधील न.ग.प.चे कर्मचारी प्रज्वल प्रचंडराव यांना दोन लाईफरींग घेऊन त्या भावंडांजवळ फेकण्यासाठी पोजिशन घ्यायला सांगितले. आणी लगेच अवघ्या एका मिनटात त्या भावंडांजवळ रेस्क्यु बोट नेत ना नेत लगेच त्या दिशेने लाईफ रींगा फेकल्या आणी क्षणार्धात दोन्ही स्विमरला जिवरक्षक दीपक सदाफळे यांनी जंम्प अटॅक असे म्हणताच त्या दिशेने टॉपर स्विमर यांनी अगदी तुटुन पडल्या सारखी झेप घेऊन पाच सेकंदात डोक्यापर्यंत बुडालेल्या अवस्थेत आणी त्या भावंडाच्या चक्क जिवणाचे शेवटचे काही सेकंद बाकी असतांनाच मृत्यूच्या दाढेतुन त्यांना बाहेर काढले आणी यावेळी उभ्या असलेल्या वारक-यांच्या मुखातुन एकच आवाज गुंजला जय हरी विठ्ठल माऊली. लगेच दिपक सदाफळे जिवरक्षक यांनी दोन्ही भावंडांना सुरक्षितपणे बोट मध्ये घेतले. या भावंडाची नावे जितेंद्र अजयकुमार कहाळ वय अंदाजे (२२) वर्ष भाऊ अभिजीत अजयकुमार कहाळ ता.विरार पालघर मंगलमुर्ती अपार्टमेंट मुंबई चे असल्याचे सांगितले.यावेळी अगदी भावनीक होऊन धिंणु वाळवंट अधिकारी यांना सांगितले की संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाचे जवान आज आमच्यासाठी देवदुत ठरले आहेत.आणी दोन्ही भाऊ एकदम ठणठणीत व पुर्णपणे सुरक्षित असल्याने EOC वाळवंट येथील डॉक्टरांनी तपासून घेताच दोन्ही भाऊ पुर्णपणे ठणठणीत असल्याचे सांगताच दोन्ही भावांनी हात वर करत आंम्हाला मिठ्या मारल्या आणी संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाचा विजय असो असे म्हणताच. ठन जाने ईस परीवार में हमने आँसुओ की जगह खुशियां लौटादीयाठ याच क्षणी आम्ही याच रुपात खुपकाही कमावल्याचे समाधान वाटले. यावेळी मिलींद शंभरकर सर जिल्हाधिकारी सोलापुर, यांनी मा.आ.व्य.फां.संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाचे प्रमुख जिवरक्षक दीपक सदाफळे यांच्या उत्कृष्ट आपत्ती व्यवस्थापनाचे तोंडभरुन कौतुक केले आपत्कालीन वाहन व शोध आणि बचाव साहित्यासह आपत्ती व सुरक्षा व्यवस्थापन जीवरक्षक व रुग्ण सेवा सेवा देण्यासाठी पथकातील स्वयंसेवक ज्ञानेश्वर म्हसाये, अतुल उमाळे, ऋषिकेश राखुंडे, मयूर सुलेदार, ऋषिकेश तायडे, उमेश पिलेवार, अजय डाके, मयूर कळसकार, विकी साटोटे, सुरज ठाकूर, निखिल ठाकरे, राम काकड, विकी पिंजरकर, शिवम वानखेडे, शुभम भोपळे, अंकुश चांभारे, मुन्ना अंधारे, अक्षय ठाकरे, सार्थक वानखडे, गोविंदा ढोके, हे जवान पंढरपूर मध्ये आपत्कालीन सेवा देत आहेत ही माहिती जीव रक्षक दीपक सदाफळे यांनी दिली आहे.



# जालन्यात ऑनलाईन वीज बिल भरण्याच्या नावाखाली प्राध्यापक महिलेची २ लाख रुपयांची फसवणूक

**साप्ता. अधिकारनामा**





**जालना :** सायबर गुन्हेगार फसवणुकीसाठी वेगवेगळे फंडे वापरताना दिसत आहेत. वेगवेगळे मेसेज आणि लिंक पाठवून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. यात अशिक्षित नागरिकांचाच समावेश नाही, तर अगदी सुशिक्षित, उच्चशिक्षित नागरिकांनाही गंडा घातला जात आहे. असाच एक प्रकार जालन्यात उघड झालाय. सायबर गुन्हेगारांनी एका महिला प्राध्यपिकेची ऑनलाईन वीज बिल भरण्याच्या नावाखाली २ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. देशभरात डिजीटल इंडियाची चर्चा सुरू असताना मोबाईल रिचार्जपासून अगदी वीज बिल भरण्यापर्यंत अनेक कामं आता घरबसल्या आपल्या मोबाईलवरून होत आहेत. मात्र, हे करताना योग्य खबरदारी न बाळगल्यास मोठ्या फसवणुकीचा सामना करावा लागत आहे. असाच प्रकार वीज बिल भरणा करताना घडल्याचं उघडकीस आलं आहे. यात वीज बिल भरण्यासाठी ॲप डाऊनलोड करताच खात्यातील पैसे परस्पर काढून घेतले गेल्याचा प्रकार घडलाय.

याविषयी सायबर सेलकडून नागरिकांना ऑनलाइन फसवणुकीबाबत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जालन्यातील बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर पायघन यांनी अशा ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहण्यासाठी आवाहन केले आहे.

# वादग्रस्त शिक्षक रणजितसिंह डिसलेंनी दिला राजीनामा

**साप्ता. अधिकारनामा**



**सोलापूर :** जागतिक शिक्षक पुरस्कार विजेते रणजितसिंह डिसले यांनी सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे शिक्षकपदाची राजीनामा अर्ज दाखल केला आहे. अमेरिकेत प्रदीर्घ अध्ययन रजा मंजुरीच्या मुद्द्यावर डिसले हे वादग्रस्त ठरले असून त्याबाबत झालेल्या चौकशीत ते दोषी आढळून आले आहेत. त्यांच्यावरील प्रशासकीय कारवाई प्रलंबित आहे. ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत क्यूआर कोड शिक्षण प्रणाली विकसित करून जागतिक पातळीवर पोहोचलेले आणि डिसेंबर २०२० मध्ये युनेस्को आणि लंडनस्थित वार्की फाऊंडेशनचा सात कोटी रूपयांचा जागतिक शिक्षक पुरस्कार मिळविलेले सोलापूर जिल्ह्यातील परितेवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रणजितसिंह डिसले हे प्रकाशझोतात आले होते. नंतर अमेरिकेतील फुलब्राईट अभ्यासवृत्ती डिसले यांना जाहीर झाल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार अमेरिकेत जाण्यासाठी त्यांनी प्रदीर्घ अध्ययन रजा मागितली होती. परंतु जिल्हा परिषद शिक्षण विभागाने त्याबाबतची रीतसर कागदपत्रे डिसले यांनी मागणी करूनही शेवटपर्यंत कोणतीही कागदपत्रे सादर केली नव्हती. उलट, शिक्षण विभागात शैक्षणिक संशोधनासाठी अमेरिकेत जाण्याकरिता रजा मंजुरीसाठी लाच मागितली, अधिकारी आपला मानसिक छळ करतात, असा गंभीर आरोप डिसले यांनी केला होता. तेव्हा तत्कालीन शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या हस्तक्षेपानंतर डिसले यांना तब्बल १५३ दिवसांची प्रदीर्घ अध्ययन रजा मंजूर झाली होती. तथापि, त्यांनी केलेल्या आरोपाची चौकशी सुरू असता डिसले यांनी आपण केलेले आरोप खरे नसून भावनेच्या भरात केलो होतो, असा पवित्रा घेतला होता.

# नेपाळमध्ये राजकीय संकट

**साप्ता. अधिकारनामा**




**काठमांडू :** पाकिस्तान, श्रीलंकेप्रमाणे नेपाळमध्ये राजकीय संकट निर्माण झाले आहे. नेपाळमधील राजकीय अस्थिरता पुन्हा एकदा निर्माण झाली आहे. शेर बहादूर देऊबा यांच्या सरकारच्या गैरकारभारामुळे विरोधी पक्षनेते के. पी. ओली शर्मा यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. विरोधी पक्षांच्या भूमिकेला नेपाळच्या सत्ताधारी पक्ष नेपाळी काँग्रेसनेही समर्थन देत पंतप्रधानांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले आहेत. के. पी. शर्मा ओली यांनी देशातील आघाडी सरकारने विश्वास गमावला असून त्यांचे सत्तेत राहण देशासाठी धोकादायक असल्याचे म्हटले आहे. शेर बाहदूर देऊबा यांनी गेल्या वर्षी १३ जुलै रोजी सरकार स्थापन केले होते. देऊबा सरकारमध्ये जनार्दन शर्मा यांना अर्थमंत्रिपद देण्यात आले होते. अर्थसंकल्प लीक केल्याचा आरोप झाल्याने शर्मा यांना पदावरुन हटवण्यात आले होते. शर्मा यांनी राजीनामा दिल्यानंतर पंतप्रधानांनी अर्थमंत्रिपद स्वतः कडे ठेवले होते. देऊबा सरकार संविधानात बदल करण्याचा प्रयत्न करत आहे, त्याला के पी शर्मा ओलींनी विरोध केला होता.

काठमांडू पोस्टच्या बातमीनुसार के पी शर्मा ओली यांनी शेर बहादूर देऊबा सरकारने विश्वास गमावला आहे. देशात अशाच घटना सुरु राहिल्यातर नेपाळमध्ये श्रीलंकेची पुनरावृत्ती होऊ शकते, असे ओली म्हणाले. अर्थसंकल्प बनवण्याच्या प्रक्रियेत उद्योजक प्रतिनिधींना सहभागी करुन घेण्यात आले आहे. देशात शस्त्र खरेदी सुरु असल्याची माहिती आहे. या घटनाक्रमामुळे सरकारला काही घटकांचे समर्थन असू शकते, आपण सावध राहिले पाहिजे, असे केपी शर्मा ओली यांनी म्हटले आहे. शेर बहादूर देऊबा यांच्या पक्षातही त्यांच्या कारभाराबद्दल असंतोष निर्माण झाला आहे. शेखर कोयराला यांनी संविधानात, बदल करण्याच्या धोरणाबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. शेखर कोयराला यांनी नेपाळी काँग्रेसने डाव्या पक्षांशी आघाडी करुन पक्षाच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम देऊबा यांचे प्रयत्न सुरु असल्याचा आरोप केला. कोयराला समर्थकांनी देऊबा यांच्या विरोधात घोषणाबाजी केली.

# सरकारी धोरणाविरोधात नेदरलँडमधील शेतकरी रस्त्यावर

**साप्ता. अधिकारनामा**



**नवी दिल्ली :** नेदरलँडमध्ये सध्या शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन सुरु आहे. सरकारी धोरणांच्या विरोधात शेतकरी रस्त्यावर उतरल्याचे चित्र दिसत आहे. हे शेतकरी ट्रॅक्टर घेऊन रस्त्यावर उतरले आहेत. जर्मनीत जाणाऱ्या मुख्य महामार्गासह अनेक मार्गावर कोंडी निर्माण झाली आहे. अमोनिया आणि नायट्रोजन ऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्यासाठी नेदरलँड सरकारने नवीन धोरण आणले आहे. या धोरणाला शेतकऱ्यांनी मोठा विरोध केला आहे. नेदरलँड अनेक वर्षांपासून नायट्रोजन उत्सर्जनामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देत आहे. त्यावर उपाय म्हणून सरकारने शेतकरी आणि पशुपालकांवर अनेक निर्बंध लादले आहेत. अमोनिया आणि नायट्रोजन ऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्यासाठी, सरकारने शेती आणि पशुपालनासाठी खतांच्या वापरावर अनेक निर्बंध आणले आहेत. नवीन धोरण लागू झाले तर शेतकरी आणि पशुपालकांवर अनेक बंधने लादले जातील, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, काही ठिकाणी शेतकऱ्यांचे आंदोलन मोडून काढण्यासाठी पोलिसांनी अश्रुधूर तसेच गोळीबार केल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

नायट्रोजन आणि अमोनियाच्या उत्सर्जनाच्या मुद्द्यावरुन नेदरलँडमध्ये सध्या वातावरण चांगलेच पेटले आहे. नेदरलँड हा युरोपमधला एक प्रमुख प्रदूषक देश बनला आहे. त्यामुळे नेदरलँड सरकारने २०३० पर्यंत नायट्रोजन ऑक्साईड आणि अमोनियाचे उत्सर्जन ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यासाठी नवे शेती धोरण जाहीर केले आहे. देशाची माती, हवा आणि पाण्याची गुणवत्ता सुधारणे ही या धोरणाची मुख्य उद्दिष्टे आहेत. या धोरणामुळे शेती आणि पशुसंवर्धनला मर्यादा येण्याची भीती आहे. नायट्रोजनयुक्त खतांचा वापर बंद करावा लागेल. अन्यथा त्या शेतकऱ्यांची शेतजमीन सरकारजमा केली जाऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना पारंपरिक शेती सोडून पर्यायी, विविध प्रकारची, कमी प्रदूषणाची शेती करावी लागणार असल्याचे नवीन नियमांमध्ये म्हटले आहे. गुरांच्या मलमूत्रातून अमोनिया तयार होतो. नव्या धोरणामुळे अमोनिया प्रदूषणासाठी जबर दंड ठोठावला जाणार आहे. त्यामुळे पशुपालकांचे कंबरडे मोडेल. डेअरी उद्योग धोक्यात येण्याची शक्यता शेतकऱ्यांनी वर्तवली आहे. नेदरलँड सरकारला २०३० पर्यंत देशभरातील नायट्रोजन ऑक्साईड आणि अमोनियाचे उत्सर्जन ५० टक्क्यांनी कमी करायचे आहे. प्राण्यांच्या मूत्र आणि विष्ठेमुळे अमोनिया वायू तयार होतो, असे सरकारचे म्हणणे आहे. अमोनिया उत्सर्जन कमी करण्याच्या हेतूने मागच्या काही वर्षांपूर्वी नेदरलँड सरकारने शेतकऱ्यांना त्यांच्या दुभत्या जनावरांसाठी कमी प्रथिने असलेले खाद्य वापरण्यास सांगितले आहे. उत्सर्जन कमी करायचे असेल तर पशुधन संगोपन अर्ध्यावर आणण्यात यावे अशी सूचना मांडण्यात आली आहे.

# 'खडकवासला' धरणातून लवकरच वीजनिर्मिती

**साप्ता. अधिकारनामा**



**पुणे :** खडकवासला धरणाच्या पाण्यावर वीजनिर्मिती करण्याच्या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. चार ते पाच महिन्यांत वीजनिर्मिती सुरू होईल. खडकवासला धरणातून मुठा उजवा कालव्यात शेतीसाठी सोडल्या जाणाऱ्या पाण्यावर १.२ मेगावॉट वीजनिर्मिती करणार आहे. यामुळे आठशे ते हजार घरांना पुरेल, एवढी वीजनिर्मिती यातून होणार आहे. पानशेत धरण फुटीच्या दुर्घटनेत पुणेकरांचे अतोनात नुकसान झाले, त्यानंतर धरणांच्या सुरक्षिततेसाठी अनेक योजना राबविला. त्यापुढे एक पाऊल टाकत आता खडकवासला धरणातून वीजनिर्मितीचे काम हाती घेतले आहे. खडकवासला धरणातून मुठा उजवा कालव्यात सोडल्या जाणाऱ्या पाण्यावर वीजनिर्मिती करण्याचा प्रकल्प २००६ मध्ये मंजूर झाला. त्यानुसार या प्रकल्पात ६०० किलोवॉटच्या दोन जनित्रांद्वारे १.२ मेगावॉट वीजनिर्मिती करणार आहे. हे वीजनिर्मितीचे काम बीओटी तत्त्वावर एका कंपनीला दिले आहे.